रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ३४
www.ramprahar.com

◆ गुरुवार, २० ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

महाराष्ट्रातील 'एसआयआर'चे सुधारित वेळापत्रक जाहीर/२

मोरबे धरणाचा पाणीसाठा ९२ टक्क्यांवर/६

गॉल कसोटीत भारताचा मोठा विजय/८

## हॉकी वर्ल्डकपमध्येही भारताने उडवला पाकिस्तानचा धुव्वा



**आम्सटेलवीन (नेदरलँड्स)** : हॉकी वर्ल्डकपमध्ये बुधवारी (दि.१९) झालेल्या 'करो वा मरो' लढतीत भारतीय संघाने कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ५-३ अशा फरकाने धुव्वा उडवत स्पर्धेची पुढील फेरी गाठली आहे. भारताकडून कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि अभिषेक यांनी प्रत्येकी दोन, तर हार्दिक सिंगने एक गोल केला. वर्ल्डकपमध्ये भारत आणि पाकिस्तान लढत म्हटले की भारताचा विजय हा ठरलेलाच असे समीकरण गेल्या काही वर्षांत बनले आहे. दरम्यान, क्रिकेट वर्ल्डकपनंतर आता हॉकीमध्येही ही परंपरा कामय राहिली आहे. स्पर्धेतील साखळी फेरीत इंग्लंडकडून पराभव झाल्याने पुढची फेरी गाठण्यासाठी भारताला पाकिस्तानविरुद्ध विजय मिळवणे आवश्यक होते. आम्सटेलवीन (नेदरलँड्समधील) येथील वागेनर स्टेडियममध्ये झालेल्या या सामन्यात भारतीय संघाने शानदार कामगिरी करीत विजय नोंदवला.

# मयत शेतकऱ्यांच्या वारसांनाही कर्जमुक्ती

## आधार प्रमाणीकरणापूर्वी मृत्यू झालेल्यांसंदर्भात कार्यप्रणाली जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत पात्र ठरलेल्या, मात्र आधार प्रमाणीकरणापूर्वी मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांबाबत शासनाने मानक कार्यप्रणाली निश्चित केली आहे. संबंधित मयत शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवर वारसांची नोंद करून त्यांची माहिती योजनेच्या पोर्टलवर अपलोड करण्यात येणार असून पात्र वारसांना योजनेच्या निकषांनुसार कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे.

राज्य शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे ही योजना सुरू केली आहे. योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन प्रणालीद्वारे



करण्यात येत असून महाआयटीमार्फत १६.९६ लाख पात्र लाभार्थ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यापैकी १३.४८ लाख लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले असून उर्वरित लाभार्थ्यांचे प्रमाणीकरण सुरू आहे. पहिल्या यादीतील काही शेतकरी आधार प्रमाणीकरणापूर्वीच मयत झाल्याचे बँकांच्या निदर्शनास आले आहे. शासन निर्णयानुसार आधार प्रमाणीकरणाशिवाय कर्जमुक्तीचा लाभ देता येत नसल्याने अशा कर्जखात्यांसाठी वारस नोंद करून सुधारित माहिती योजना पोर्टलवर अपलोड करण्याची प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे.

एका मयत शेतकऱ्याच्या कर्जखात्यास एकापेक्षा अधिक वारस असल्यास योजनेच्या निकषांनुसार कर्ज रकमेतील त्यांच्या हिस्स्याच्या प्रमाणात कर्जमुक्तीची रक्कम कर्जखात्यात वर्ग केली जाईल, मात्र योजनेच्या निकषांनुसार एखादा वारस अपात्र ठरल्यास त्याला कर्जमुक्तीचा लाभ मिळणार नाही.

### अशी आहे प्रक्रिया

संबंधित कर्जदार शेतकरी मयत झाल्याची माहिती वारसाकडून प्राप्त झाल्यानंतर बँकेने आपल्या प्रचलित धोरणानुसार कर्जखात्यावर वारसांची नोंद करावी. त्यानंतर योजनेच्या पोर्टलवरील सुविधेद्वारे वारसांची माहिती अपलोड करावी. वारसांचे कर्जखात्यातील हिस्सेही नमूद करावे लागणार आहेत. वारसाचे नाव, आधार क्रमांक, जन्मतारीख, लिंग, मोबाइल क्रमांक, ॲग्रीस्टॅक नोंदणी, सीआयएफ, बचत खाते क्रमांक, कर्ज खाते क्रमांक आणि कर्जातील वारसाचा हिस्सा आदी माहिती ऑनलाइन अपलोड करावी लागेल.

## राजिपला सर्वतोपरी सहकार्य करणार -पालकमंत्री गोगावले

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे. पालकमंत्री म्हणून रायगड जिल्हा परिषदेला जे सहकार्य हवे असेल ते आपल्याकडून मिळेल, अशी ग्वाही रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांनी दिली.

रायगड जिल्हा परिषदेतर्फे नवनियुक्त पालकमंत्री भरत गोगावले यांचा बुधवारी (दि. १९) सत्कार करण्यात आला. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

कार्यक्रमास आमदार महेंद्र दळवी, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, वित्त व शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, दुग्ध व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील, महिला व बालकल्याण सभापती रसिका केणी, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त



मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, जि.प. सदस्य मानसी दळवी, विकास गोगावले, सचिन राऊळ, अनंत गोंधळी, गटनेते अमित नाईक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर पठारे (सामान्य प्रशासन), विशाल तनपुरे (ग्रामपंचायत), शिक्षणाधिकारी महारूद्र नाळे (माध्यमिक), संजय नाईकडे (प्राथमिक), महिला व बालकल्याण समिती कार्यक्रम अधिकारी निर्मला कुचिक, बांधकाम कार्यकारी अभियंता विनायक तेलंग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग कार्यकारी अभियंता मोहन सरवदे, समाजकल्याण अधिकारी सुनीता मते यांच्यासह इतर सदस्य, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

दोन वर्षांनंतर भरत गोगावले यांच्या रूपाने रायगड जिल्ह्याला पालकमंत्री लाभले असल्याने आता विकासकामांना गती मिळेल. त्यामुळे आपण सर्व एकत्रितपणे रायगड जिल्ह्याच्या विकासाठी काम करू, असे रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर म्हणाले. कृषी सभापती वैकुंठ पाटील यांनी आभार व्यक्त केले.

## गतिमंद महिलेवर बलात्कार करणाऱ्या वृद्धाला सश्रम कारावास



**पाली, माणगाव : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील पोटलज खुर्द येथे गतिमंद महिलेच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्या ६३ वर्षीय वृद्धास माणगाव येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने १० वर्षे सश्रम कारावास आणि दंडाची कडक शिक्षा सुनावली आहे. सदानंद काशिनाथ कदम असे या नराधमाचे नाव आहे.

पोटलज खुर्द येथे राहणारी पीडित महिला आपल्या घराच्या पायऱ्यांवर बसलेली असताना आरोपी सदानंद कदम याने ती गतिमंद असल्याचे पाहून तिला आमिष दाखवले. त्यानंतर त्याने तिला स्थानिक नागरिक दिनेश हुले यांच्या बंद घराच्या व्हरांड्यात नेऊन बलात्कार केला. याप्रकरणी अर्जुन रामजी हुले यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पाली पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली होती.

माणगाव येथील अतिरिक्त सत्र न्यायालय १मध्ये या खटल्याची सुनावणी झाली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि सबळ पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी सदानंद कदम याला दोषी ठरवले. न्यायालयाने पीडित महिलेला एक लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेशही दिले आहेत.

## येत्या रविवारी खारघर हिल महापौर मॅरेथॉन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर हिल महापौर मॅरेथॉन ही देशातील पूर्ण ४२ किमी असणारी पहिली हिल मॅरेथॉन आहे. आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त झालेल्या एआयएमएस प्रमाणकामुळे या मॅरेथानला महत्त्व प्राप्त झाले असून पुढील वर्षापासून याला जागतिक मान्यता मिळून देश-विदेशातील धावपटू आकर्षित होतील. या मॅरेथॉनमुळे पनवेल महानगरपालिकेची राष्ट्रीय व जागतिक स्तरावर एक स्वतंत्र ओळख निर्माण होईल, जी नागरिकांसाठी अभिमानास्पद गोष्ट आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने या मॅरेथॉनमध्ये सहभागी व्हावे, असे





आवाहन महापौर नितीन पाटील यांनी केले आहे.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी पनवेल महापालिकेच्या वतीने २३ ऑगस्ट रोजी खारघर हिल महापौर मॅरेथॉन आयोजिण्यात आली आहे. त्याबाबत माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत महापौर बोलत होते.

मुख्य प्रवर्तक नगरसेवक परेश ठाकूर, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे आणि महापालिका सदस्य उपस्थित होते.

### पर्यावरण संवर्धनासाठी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

यावेळी मॅरेथॉनचे मुख्य प्रवर्तक नगरसेवक परेश ठाकूर यांनी सांगितले की, पनवेल महापालिकेच्या माध्यमातून मैदाने आणि उद्यानांचे नूतनीकरण केले जात आहे. महापालिका कार्यक्षेत्रात विविध क्रीडा प्रकारांना प्रोत्साहन, आरोग्याला चालना आणि तरुणांना-खेळाडूंना संधी प्राप्त करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. खारघर हिल महापौर मॅरेथॉन हा त्याचाच एक भाग असून मोठ्या संख्येने या मॅरेथॉनमध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

स्पर्धा ४२ किमी फुल मॅरेथॉन, २१ किमी हाफ मॅरेथॉन, १० किमी रन, ५ किमी रन, ३ किमी फन रन (दिव्यांग व्यक्ती, लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिक) अशा विविध गटांमध्ये घेण्यात येणार आहे. महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांमधून १० हजार धावपटूंना सहभागी करून घेण्यासाठी डिजिटल आणि प्रत्यक्ष प्रचार मोहीम राबवण्यात येत आहे. (पान २ वर..)

## निवडक

### केंद्रीय मंत्रिमंडळाकडून हायवे, रेल्वेमार्गांना मंजुरी

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.१९) झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत देशातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी १३०४१ कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. यासंदर्भात केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. पश्चिम बंगाल, ओडिशा, आंध्र प्रदेश व तामिळनाडूतील चार रेल्वेमार्ग आणि बिहारमधील एका चौपदरी महामार्गाच्या प्रकल्पाला कॅबिनेटने मंजुरी दिली असल्याचे त्यांनी सांगितले.

### खासदार महुआ मोइत्रा यांच्याविरोधात अटक वॉरंट

**कोलकाता** : तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोइत्रा यांच्याविरोधात पश्चिम बंगालमधील नादिया जिल्ह्यातील कृष्णानगर न्यायालयाने अटक वॉरंट जारी केले. चिथावणीखोर आणि द्वेषपूर्ण भाषणाच्या प्रकरणात न्यायालयाने त्यांना समन्स पाठवूनही त्या वारंवार गैरहजर राहिल्या.

## उरणमध्ये सावत्र बापाकडून चिमुकल्याची निर्घृण हत्या

### बनाव उघड; पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**उरण : बातमीदार**

तू माझा पप्पा नाहीस, मला माझ्या खऱ्या पप्पांकडे जायचंय... अवघ्या साडेतीन वर्षीय चिमुरड्याच्या या निष्पाप हट्टाचा संताप अनावर होऊन क्रूर सावत्र पित्याने त्याची निर्घृणपणे हत्या केल्याची धक्कादायक घटना उरणमधील मोरा येथे उघडकीस आली आहे.

विशेष म्हणजे हत्येनंतर मुलगा खेळताना पलंगावरून पडून जखमी झाल्याचा बनाव रचून घाईघाईत अंत्यसंस्कार उरकण्याचाही सावत्र पित्याचा डाव होता, मात्र मोरा सागरी पोलिसांच्या सतर्कतेने आणि शवविच्छेदन अहवालाने या हत्येचा पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी सावत्र पित्याला बेड्या ठोकल्या आहेत.

या घटनेतील मृत बालक मोक्ष (३ वर्षे ५ महिने) हा आई काव्या आणि तिचा दुसरा पती जितेंद्र प्रदीप भिसे (२८) यांच्यासह उरण मोरा येथील फणसवाडीत राहत होता. मोक्ष हा सावत्र मुलगा असल्याने जितेंद्र भिसे त्याचा किरकोळ कारणांवरून सतत मारहाण करून शारीरिक व मानसिक छळ करत होता.

१४ ऑगस्ट रोजी दुपारी घरात मोक्ष आणि जितेंद्र दोघेच होते. यावेळी मोक्षने आरोपी जितेंद्र याला तू माझा पप्पा नाहीस, मला माझ्या खऱ्या पप्पांजवळ जायचे आहे, असा हट्ट धरला. याचा राग आल्याने जितेंद्रचे मानसिक संतुलन सुटले आणि त्याने चिमुकल्या मोक्षचे डोके थेट भिंतीवर आपटले तसेच लाकडी काठीने त्याच्या पायांवर बेदम मारहाण केली. तेवढ्यावरच न थांबता त्याने मोक्षला सोफ्यावर पाडून त्याच्या छातीवर जोरात ठोसा (पंच) मारला. यात त्याचा जागीच तडफडून मृत्यू झाला. (पान २ वर..)

## चवदार तळे सुशोभीकरण कामाची मंत्री संजय शिरसाट यांच्याकडून पाहणी

**महाड : प्रतिनिधी**

महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे सुशोभीकरण प्रकल्पाची सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी पाहणी केली. या प्रकल्पासाठी यापूर्वी करण्यात आलेल्या ५६ कोटी रुपयांच्या निधीच्या तरतुदीनंतर आता आणखी ४० कोटी रुपयांची विशेष वाढीव तरतूद करण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली. पुढील वर्षी चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे लोकार्पण करण्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मंत्री शिरसाट यांनी मंगळवारी महाडमध्ये येऊन ऐतिहासिक सत्याग्रह घाटाची पाहणी केली. घाटाच्या पायऱ्यांवरून खाली उतरून त्यांनी बोटीने चवदार तळ्यात फेरफटका मारत संपूर्ण परिसराची पाहणी केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रकल्पाच्या नियोजनाची आणि कामाच्या प्रगतीची माहिती घेत त्यांनी आवश्यक त्या सूचना केल्या.

'चवदार तळे सत्याग्रह दिनाचा शतक



महोत्सवी वर्धापन दिन अनुभवायचा आहे. त्यासाठी जे काही चांगले करता येईल, ते करण्याचा मानस आहे,' असे मंत्री शिरसाट यांनी सांगितले. पुढील वर्षी शताब्दी वर्षात या प्रकल्पाचे लोकार्पण करण्याच्या दृष्टीने कामाला गती देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या प्रकल्पाशी संबंधित कंपनी, ठेकेदार आणि प्रशासनातील अधिकाऱ्यांशी संवाद साधणे हे आपले कर्तव्य असून कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आवश्यकता भासल्यास आपण महिन्या-दोन महिन्यांनी महाडला येत राहू, असे मंत्रीमहोदयांनी सांगितले. काम वेळेत आणि नियोजनानुसार पूर्ण व्हावे यासाठी संबंधित यंत्रणांशी सातत्याने समन्वय ठेवला जाणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### पाणी शुद्धिकरणाला विशेष प्राधान्य

चवदार तळे सुशोभीकरणात केवळ परिसराचे सौंदर्यवर्धन न करता तळ्याच्या पाण्याच्या शद्धिकरणाला विशेष प्राधान्य दिले जाणार आहे. पंजाबमधील अमृतसर येथील सुवर्ण मंदिराच्या तलावातील पाण्याचे ज्या धर्तीवर जलशुद्धिकरण करण्यात आले आहे, त्याच धर्तीवर चवदार तळ्याच्या पाण्याचेही जलशुद्धिकरण करण्यात येणार असल्याचे मंत्री शिरसाट यांनी सांगितले. त्यामुळे या ऐतिहासिक प्रकल्पातील जलशुद्धिकरणाचा भाग महत्त्वाचा ठरणार आहे.


## पनवेलमध्ये श्रावण महोत्सवाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद


**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेला श्रावण महोत्सव मंगळवारी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात महिलांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात रंगला. सर्व स्तरांतील महिलांच्या सहभागामुळे हा महोत्सव संस्मरणीय ठरला.

प्रारंभी महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, मधू पाटील, अतिरिक्त आयुक्त मेघमाळे यांच्यासह नगरसेवक-नगरसेविका, पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

महिला सक्षमीकरणाचा संदेश देणारा अनोखा फॅशन शो महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरला. अबोली संघटनेच्या महिला रिक्षाचालक, एकल महिला,





*महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांमध्ये महिला व बालकल्याण समितीच्या सर्व सदस्यांचा नेहमीच सकारात्मक प्रतिसाद मिळतो. त्याच सहकार्यामुळे हा श्रावण महोत्सव इतक्या मोठ्या स्वरूपात यशस्वी झाला. प्रत्येक स्तरातील महिलांसोबत आम्ही सर्व महिला नगरसेविका सक्षमपणे उभ्या आहोत.*

***-ममता म्हात्रे, सभापती, महिला व बालकल्याण समिती, पनवेल महापालिका***

### स्थानिकांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ

स्थानिक कलाकार आणि महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. आदिवासी नृत्य, मंगळागौर, कोळी नृत्य, लावणी यांसह विविध कार्यक्रमांना महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विशेष मुलांनी सादर केलेला परफॉर्मन्स आणि गणेश वंदना हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. या सादरीकरणांना उपस्थित महिलांनी भरभरून दाद दिली.

स्वच्छतादूत कर्मचारी, आशा सेविका, दिव्यांग महिला, विशेष मुले, तृतीयपंथी, ज्येष्ठ नागरिक महिला आणि लहान मुलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्यांच्यासोबत महानगरपालिकेच्या नगरसेविकांनीही हॅण्डलूमच्या साड्या परिधान करून फॅशन शोमध्ये सहभाग घेतला.

महिला सुरक्षेच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या 'शी-बॉक्स या ऑनलाइन पोर्टलची माहितीही कार्यक्रमात महिलांना देण्यात आली. कार्यस्थळी लैंगिक छळ किंवा संबंधित स्वरूपाची समस्या उद्भवल्यास महिला या पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाइन तक्रार नोंदवू शकतात. संबंधित यंत्रणेमार्फत तक्रारीवर कार्यवाही व तक्रार निवारणाची प्रक्रिया कशी केली जाते याबाबत उपस्थित महिलांना माहिती देण्यात आली.

महिला व बालकल्याण समितीच्या सर्व सदस्यांनी कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला. महिला सक्षमीकरण, महिलांची सुरक्षा, रोजगार, आरोग्य आणि विविध सामाजिक प्रश्नांसाठी सर्व महिला नगरसेविका एकत्रितपणे काम करण्यास सक्षम असल्याचा सकारात्मक संदेश यानिमित्ताने पनवेलकरांना देण्यात आला.

महोत्सवात मनोरंजनासोबत महिला सुरक्षा, सामाजिक समावेशकता, विशेष मुलांना प्रोत्साहन, महिला सक्षमीकरण, स्थानिक कलागुणांना व्यासपीठ अशा विविध विषयांची सांगड घालण्यात आली. (पान २ वर..)

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून हत्या; नराधम अटकेत

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात नसरापूर अत्याचार घटनेची पुनरावृत्ती झाली आहे. चौथीत शिकणाऱ्या एका चिमुरडीवर तिच्याच शेजारी राहणाऱ्या नराधमाने अत्याचार करून तिची हत्या केल्याचा संतापजनक प्रकार पिंपळवंडी येथे समोर आला आहे. याप्रकरणी २५ वर्षीय आरोपी साहिल खैरे याला पोलिसांनी अटक केली आहे.

नेहमीप्रमाणे मंगळवारी मुलीचे आईवडील शेतात मजुरीसाठी गेले होते, तर नऊ वर्षीय मुलगी कांजण्या आल्यामुळे शाळेत गेली नव्हती. आरोपी तरुणाने मुलीला सायकलवरून उसाच्या शेतात नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला आणि नंतर तिची गळा दाबून हत्या केली. पोलीस तपासात सारा प्रकार उघडकीस आला आणि नराधमाचे बिंग फुटले.

## पांडवकडा धबधब्यात बुडून तरुणाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

खारघरच्या पांडवकडा धबधब्यात बुडून एकाचा मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि.१९) सकाळी उघडकीस आली. प्रणव मिश्रा (१६, रा. कुर्ला, मुंबई) असे मृत तरुणाचे नाव असून अग्निशमन दलाच्या जवानांनी त्याचा मृतदेह बाहेर काढला.

पांडवकडा धबधबा येथे एक जण बुडाला असल्याची माहिती खारघर अग्निशमन केंद्राला बुधवारी सकाळी पावणेसहाच्या सुमारास समजली. जवान घटनास्थळी पोहचले असता धबधब्यात जास्त प्रमाणात पाणी पडत होते. त्यांनी पाण्यात उतरून तरुणाचा शोध घेतला. यावेळी एका दगडाच्या कपारीत १० ते १२ फूट खोल एक जण मृतावस्थेत आढळून आला. त्याला पाण्याबाहेर काढून स्ट्रेचरवर ठेवून डोंगराच्या खाली उतरवण्यात आले आणि रुग्णवाहिकेने रुग्णालयात पाठवण्यात आले. घटनास्थळी स्थानिक पोलीसही हजर होते. या



मृत्यूप्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

मागील आठवड्यातदेखील पांडवकडा धबधब्याजवळ बुडून २३ वर्षीय आदित्य विश्वकर्मा या तरुणाचा मृत्यू झाला होता. या ठिकाणी प्रशासनाकडून नागरिकांना बंदी घालण्यात आली आहे, मात्र काही उत्साही पर्यटक आडमार्गाने जाऊन आपला जीव धोक्यात घालतात. तसे करू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# ७० हजार सोसायट्यांना दिलासा

## ‘डीम्ड कन्व्हेअन्स’चा मार्ग मोकळा; कार्यवाहीचे आदेश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील लाखो सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकास प्रक्रियेतील प्रलंबित प्रश्न आणि महसूल विभागाशी संबंधित सवलतींची तत्काळ अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी धोरण निश्चित करून अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले आहेत. यामुळे राज्यातील सुमारे ७० हजार गृहनिर्माण सोसायट्यांच्या ‘डीम्ड कन्व्हेअन्स’चा मार्ग अखेर मोकळा झाला आहे.



मंत्रालयात महसूलमंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली याविषयी विशेष बैठक झाली. आमदार प्रवीण दरेकर, आमदार संजय केळकर उपस्थित होते. या बैठकीत सोसायट्यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्यांवर सविस्तर चर्चा होऊन महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.सध्या अनेक संस्था युडीसीपीआरमध्ये समाविष्ट नसल्याने त्यांच्या स्वयंपुनर्विकासात अडचणी येत आहेत. ही संपूर्ण राज्याची परिस्थिती आहे. यावर तोडगा काढण्यासाठी २०१९ च्या शासन निर्णयानुसार इतर करांमध्ये सवलत देण्याचे आणि १० टक्के प्रोत्साहन (इन्सेन्टिव्ह) देण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत. तसेच, स्वयंपुनर्विकासासाठी ‘वर्क कॉन्ट्रॅक्ट’ आणि ‘डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट’ बाबतचा सुटसुटीत मसुदा तयार करून देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

फायनान्स विभागाकडून चार टक्के सवलत मिळणे आवश्यक असून त्यासाठी गृहनिर्माण विभागाने त्वरित प्रस्ताव सादर करावा आणि नोंदणी महानिरीक्षकांकडून याबत स्पष्टता आणावी, असे निर्देशही बैठकीत देण्यात आले. राज्यात सध्या सुमारे एक लाख १५ हजार नोंदणीकृत सोसायट्या असून, त्यापैकी तब्बल ६० ते ७० हजार सोसायट्यांचे अद्याप ‘डीम्ड कन्व्हेअन्स’ झालेले नाही. सहकार, महसूल, जमाबंदी आणि आयजीआर विभागांच्या समन्वयाने ही प्रक्रिया राबविली जाणार आहे. नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांच्या मालमत्ता पत्रकावर (प्रॉपर्टी कार्ड) किंवा सातबारा उताऱ्यावरील इतर हक्कांमध्ये आता थेट सोसायटीच्या नावाची नोंद करण्यात यावी, अशा सूचना महसूलमंत्र्यांनी केल्या आहेत.

म्हाडामधील सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी शासनाने अकृषिक कर यापूर्वीच रद्द केला आहे. तरीही काही ठिकाणी तो वसूल केला जात असल्याची बाब लक्षात आणून देण्यात आली. यासोबतच इमारतींमधील नागरी कमाल जमीन धारणा आरक्षित असलेल्या सदनिकांबाबत योग्य कार्यपद्धती निश्चित करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

# खाडीकिनारी गावांच्या विकासासाठी उपमहापौरांनी घेतला पुढाकार

## मच्छीमारांच्या प्रश्नांवर बैठक

**नवी मुंबई : बातमीदार**

मच्छीमार समाजाच्या विविध समस्या, खाडीकिनारी वसलेल्या गावांच्या विकासाचे प्रश्न तसेच आगामी विकासकामे आणि शासनाच्या विविध योजनांचा मच्छीमार बांधवांना अधिकाधिक लाभ मिळवून देण्याबाबत सातपाटी मच्छीमार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात उपमहापौर दशरथ भगत यांची भेट घेतली. उपमहापौर दालनात झालेल्या बैठकीत मच्छीमार समाजाशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



मच्छीमार बांधवांच्या हक्कांचे संरक्षण, त्यांच्या समस्या सोडविणे, शासनाच्या योजनांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचविणे आणि खाडीकिनारी गावांचा सर्वांगीण विकास यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल. तसेच मच्छीमार समाजाच्या प्रश्नांबाबत वनमंत्री गणेश नाईक यांच्याशी चर्चा करून ते प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन उपमहापौर दशरथ भगत यांनी यावेळी दिले. नवी मुंबई परिसरातील खाडीकिनारी असलेल्या गावांमधील लहान मच्छीमार, मत्स्य व्यवसायाशी संबंधित कुटुंबे आणि मच्छी विक्री करणाऱ्या महिलांच्या विविध अडचणींवर यावेळी विशेष चर्चा झाली. लहान मच्छीमार संस्था आणि सहकारी संस्थांना अधिक सक्षम करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील, तसेच शासनाच्या नव्या योजना आणि धोरणांचा लाभ तळागाळातील मच्छीमार बांधवांपर्यंत प्रभावीपणे कसा पोहोचवता येईल, याबाबतही विचारविनिमय करण्यात आला.

मच्छी विक्री करणाऱ्या महिलांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, त्यांच्या व्यवसायाला अधिक सुरक्षित व सक्षम वातावरण मिळवून देणे आणि त्यांच्या राहणीमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज यावेळी मांडण्यात आली. मत्स्य व्यवसायाला शेती व्यवसायासमान दर्जा देण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या विविध योजनांचा मच्छीमार समाजाला अधिकाधिक लाभ मिळावा, यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य करण्याबाबतही चर्चा झाली. यासोबतच नवी मुंबईतील खाडीकिनारी गावांमधील स्थानिक विकासकामे, मच्छीमार बंदर व संबंधित पायाभूत सुविधांचा विकास तसेच आगामी काळातील विविध विकासकामांमध्ये मच्छीमार समाजाच्या गरजा आणि हिताचा विचार करण्याची मागणी करण्यात आली.

मच्छीमार समाजाच्या या विविध मागण्या व प्रश्नांबाबत राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्याशी चर्चा करून त्यांच्यामार्फत आवश्यक ते सहकार्य मिळवून देण्यात यावे, अशी विनंती सातपाटी मच्छीमार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी उपमहापौर दशरथ भगत यांच्याकडे केली. यावेळी मच्छीमार नेते राजेंद्र मेहेर, सातपाटी मच्छीमार सहकारी संस्थेचे चेअरमन विनोद नाईक, संचालक अनिल चौधरी, संचालक दीलकुश तांडेल तसेच मच्छीमार समाजसेवक जयेश आक्रे उपस्थित होते.

# गणेशोत्सवापूर्वी नवी मुंबईतील रस्ते खड्डेमुक्त करणार; रोड पेट्रोलिंग सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

शहराच्या हद्दीत रस्त्यावर पडणारे खड्डे आणि येणाऱ्या गणेशोत्सव कालावधीत नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांबाबत महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे घेतलेल्या बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. याबाबत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी अभियांत्रिकी विभागास सूचना निर्गमित केल्या आहेत.

त्यानुसार महानगरपालिका हद्दीतील सर्व रस्त्यांची पाहणी करण्यासाठी अधिकाऱ्यांचे विभागनिहाय पथक तयार करण्यात येत आहे. याअंतर्गत ‘रोड पेट्रोलिंग’ ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे रस्त्यावरील सर्व खड्डे जिओ टॅग करण्यात यावेत. सर्वसाधारणपणे खड्डे हे खडी व डांबर/खडी व रेती अथवा पेव्हर ब्लॉक्सने न भरता मास्टिक जिओपॉलिमरने भरण्यात यावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत. मोठ्या प्रमाणात खड्डे असतील तर ते तंत्रज्ञानाने भरून रस्ते वाहतुकीसाठी सुरळीत करण्यात यावेत, असेही सूचित करण्यात आले. गणेशोत्सवात कृत्रिम तलाव उपलब्ध करून देण्यात यावेत या सूचनेची तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

# ‘एसआयआर’ अंतर्गत प्राप्त अर्जांचे डिजिटलायझेशन पूर्ण

**नवी मुंबई : बातमीदार**

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम अर्थात एसआयआर अंतर्गत ३० जूनपासून १७ ऑगस्टपर्यंत नागरिकांकडून गणनाप्रपत्रे भरून घेऊन त्यांचे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्यामार्फत डिजिटलायझेशन करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

१७ ऑगस्टपर्यंत १५० ऐरोली विधानसभा मतदारसंघात एकूण ४,९७,३८० मतदारांपैकी २,७८,२२८ गणनाप्रपत्रे मतदारांकडून बीएलओकडे माहिती भरून जमा करण्यात आली असून त्यांचे डिजिटलायझेशन पूर्ण झाले आहे. त्याचप्रमाणे १५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघातील ४,२,३१७ मतदारांपैकी २,५६,९८६ गणनाप्रपत्रे मतदारांकडून बीएलओकडे आवश्यक माहिती भरून जमा झाली असून त्यांचे डिजिटलायझेशन पूर्ण झाले आहे.



बीएलओमार्फत गणनाप्रपत्रे संकलित झाल्यानंतर २४ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. मतदारांनी आपले नाव प्रारूप मतदार यादीत आहे का हे तपासण्यासाठी मतदान केंद्र अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा अथवा राष्ट्रीय मतदार सेवा पोर्टलला भेट देऊन ऑनलाईन तपासावे, असे आवाहन अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी केले आहे.

हा कार्यक्रम योग्य रितीने राबविण्यासाठी नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी बीएलओ, मतदार नोंदणी अधिकारी, सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्यासह नागरिक व सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, प्रतिनिधींनीही मोलाचे सहकार्य केले.

# महाराष्ट्रातील ‘एसआयआर’चे सुधारित वेळापत्रक जाहीर

## अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबर रोजी होणार प्रसिद्ध

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाचा सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. १ ऑक्टोबर २०२६ ही पात्रता तारीख निश्चित करून राबविण्यात येणाऱ्या या प्रक्रियेत मतदान केंद्रांचे सुसुत्रीकरण आणि प्रारूप मतदार याद्या तयार करण्यासंबंधीची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्याच्या उद्देशाने वेळापत्रकात ही सुधारणा करण्यात आली आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना २४ ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. प्रारूप मतदार यादीसंदर्भात ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती दाखल करता येऊ शकतील. तसेच ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत प्राप्त दावे व हरकतींबाबत नोटीस देणे तसेच त्यांचा निपटारा करण्यात येईल. या संपूर्ण प्रक्रियेनंतर महाराष्ट्रातील अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे, असे भारत निवडणूक आयोगाने कळविले आहे.

# आरसीएफ थळ युनिटमध्ये कान्होजी आंग्रेंची जयंती साजरी

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ), थळ युनिट, अलिबाग येथील आरसीएफ वसाहत, कुरुळ परिसरात मराठा आरमाराचे सरसेनापती सरखेल कान्होजी आंग्रे यांची जयंती अत्यंत श्रद्धापूर्वक आणि उत्साहात साजरी करण्यात आली.



कार्यक्रमास आरसीएफ थळ युनिटचे कार्यपालक संचालक नितीन हिरडे, प्रकल्प आणि कॉर्पोरेट समन्वय कार्यपालक संचालक ज्योती पाटील, रघुजी आंग्रे यांच्यासह कंपनीचे विविध वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समारंभाच्या सुरुवातीला आरसीएफ कॉलनीतील मुख्य व्यासपीठावर मान्यवरांच्या हस्ते सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यानंतर भव्य स्मारकातील सरखेल आंग्रे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास गगनभरारी व्यासपीठाच्या साह्याने पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राकेश कवळे यांनी केले. आपल्या मनोगतात डॉ. कवळे म्हणाले की, आजच्या पिढीने सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या जीवनातून प्रेरणा घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या धाडसातून आपल्याला राष्ट्रनिष्ठा, त्यांच्या शौर्यातून आत्मविश्वास, त्यांच्या नेतृत्वातून कर्तव्यनिष्ठा, तर त्यांच्या त्यागातून देशसेवेची प्रेरणा मिळते. आज आपण सरखेल कान्होजी आंग्रे यांना अभिवादन करत असताना त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आदर्श आपल्या आचरणात आणण्याचा संकल्प करूया. आपण ज्या संस्थेत काम करतो, त्या संस्थेच्या प्रगतीसाठी प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि एकजुटीने योगदान देणे, हीच सरखेल कान्होजी आंग्रे यांना खरी आदरांजली ठरेल.

यावेळी उपस्थितांनी सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या अद्वितीय शौर्य, कुशल नेतृत्व, अचूक सागरी युद्धकौशल्य आणि उत्तुंग राष्ट्रभक्तीच्या महान वारशाचे आदराने स्मरण केले. भारतीय सागरी सीमांचे रक्षण व सशक्त आरमाराच्या उभारणीत त्यांनी दिलेले योगदान सर्वकाळ प्रेरणादायी राहील, असा सूर यावेळी व्यक्त करण्यात आला.

# नवी मुंबईत प्रथमच अण्णा भाऊ साठेंची जयंती

## समाज बांधवांमध्ये पसरले आनंदाचे वातावरण

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहरातील नेरुळ ते बेलापूर परिसरात मोठ्या प्रमाणावर वास्तव्यास असलेल्या मातंग समाजाला प्रगतीच्या वाटा दाखवणाऱ्या क्रांतीसूर्य साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांची जयंती यंदा प्रथमच नवी मुंबईत शासकीय पातळीवर साजरी होणार आहे. त्यामुळे सर्वांनी आनंद व्यक्त केला आहे.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे आणि महापौर सुजाता पाटील यांची सकल मातंग समाज आणि कार्यकर्त्यांनी सदिच्छा भेट घेऊन आभार मानले. स्व. बाबासाहेब गोपले आणि महापालिका परिवहन समितीचे माजी सभापती स्वर्गीय उमाकांत नामवाड यांनी ३० ते ३५ वर्षांपूर्वीपासून ठाणे जिल्हा आणि नवी मुंबईत राहणाऱ्या मातंग समाजाला एकसंघ ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले होते. नवी मुंबई महापालिकेच्या माध्यमातून शहरातील समाज बांधवांनी मागील अनेक वर्षांपासून जयंती उत्सव साजरा करण्यासाठी पाठपुरावा केला.

सामाजिक कार्य करणाऱ्या ज्येष्ठ मंडळींनीदेखील ही मागणी लावून धरली होती. माजी महापौर सुधाकर सोनवणे, माजी नगरसेविका काशीबाई लांडगे, नगरसेविका अनिता मानवतकर, अ‍ॅड. श्वेता काळे यांनीदेखील निधी उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा केला आहे. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांची भेट घेऊन सर्व समाज बांधवांनी कार्यक्रमाच्या नियोजनाविषयी चर्चा केली. यावेळी समाजातील गुणवंतांचा गौरव, आजी-माजी नगरसेवकांचा सन्मान सोहळा, सामाजिक कार्यासाठी योगदान देणाऱ्या ६५ वर्षांवरील ज्येष्ठांचा सन्मान, प्रबोधनात्मक कार्यक्रम आणि मान्यवरांचे मार्गदर्शन असे विविध कार्यक्रम होणार आहेत.

पालिका आयुक्तांच्या भेटीप्रसंगी माजी नगरसेविका काशीबाई लांडगे, समाजसेवक सुभाष काळे, सुरेश मानवतकर, संदीप नामवाड, अंकुश घेरे, पत्रकार ज्ञानेश्वर जाधव, पांडुरंग गायकवाड, अण्णाराव लोकरे, जगन्नाथ गायकवाड, राहुल गोपले, विनोद गवाले, चंपत गव्हाणे, गणेश हिवाळे, सचिन सुरडकर, बालाजी सूर्यवंशी, बब्रुवान अर्जुन, साहेबराव बाजड, रवी पाटोळे, सचिन भालेराव आदी उपस्थित होते.

पान १ वरुन

### येत्या रविवारी खारघर हिल महापौर मॅरेथॉन

पर्यावरणाचे संवर्धन करण्याचा संदेश या खारघर हिल महापौर मॅरेथॉनच्या माध्यमातून दिला जाणार आहे. यानिमित्ताने खास बनविण्यात आलेल्या शुभंकरचे (मॅस्कॉट) अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्याचबरोबर या मॅरेथॉनसाठी खास बनविण्यात आलेल्या टी-शर्टचे अनावरणही यावेळी झाले.

देशभरातील मॅरेथॉनसाठी होणारा मोठा प्रवासखर्च आणि वेळ वाचवण्यासाठी धावपटूंसाठी खारघर हिल महापौर मॅरेथॉन हा एक उत्तम पर्याय आहे. राज्यातील इतर दूरच्या मॅरेथॉनच्या तुलनेत पनवेल मॅरेथॉन अधिक किफायतशीर आहे. या स्पर्धेमुळे धावपटूंच्या वेळेसह पैशांचीही बचत होणार आहे. विशेष म्हणजे शहरातील गर्दीच्या रस्त्यांऐवजी डोंगर, टेकड्या, हिरवळ आणि स्वच्छ हवेच्या सान्निध्यात धावण्याचा अद्वितीय अनुभव इथे मिळेल. त्यामुळे मोठ्या संख्येने या मॅरेथॉनमध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

### उरणमध्ये सावत्र बापाकडून चिमुकल्याची निर्घृण हत्या

दरम्यान, आरोपीने मुलाच्या हत्येनंतर अपघाताचा बनाव रचून पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला होता, मात्र वैद्यकीय अहवाल आणि तांत्रिक तपासामुळे सत्य समोर आले. हत्येप्रकरणी आरोपी जितेंद्र प्रदीप भिसे याला हत्या आणि बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायद्यानुसार अटक करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल कटवाणी यांनी दिली. न्यायालयाने आरोपीला २० ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

### पनवेलमध्ये श्रावण महोत्सवाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

या महोत्सवाला पनवेल नगर परिषदेच्या काळात काम केलेल्या माजी ज्येष्ठ महिला नगरसेविका विशेषत्वाने उपस्थित होत्या. कार्यक्रमातील नवोदित कलाकारांना त्यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. विद्यमान अनेक नगरसेविका कार्यक्रमस्थळी उपस्थित असतानाही ज्येष्ठ महिला लोकप्रतिनिधींना हा सन्मान देण्यात आला.

महोत्सवाच्या ठिकाणी बौद्धिक दिव्यांग मुलांनी स्वतःच्या हाताने तयार केलेल्या राख्यांचे विक्री केंद्र उभारण्यात आले होते. या मुलांच्या कलागुणांना प्रोत्साहन आणि त्यांच्या स्वावलंबनाला हातभार लावण्यासाठी उपस्थित प्रत्येक महिलेने या केंद्रातून किमान दोन राख्या खरेदी कराव्यात, असे आवाहन महिला व बालकल्याण समितीच्या सभापती प्रीतम म्हात्रे यांनी केले. आपल्या छोट्याशा योगदानातून या विशेष मुलांच्या प्रयत्नांना बळ मिळू शकते, असा संदेश त्यांनी यावेळी दिला.

# प्लास्टिकपासून स्वातंत्र्य उपक्रमात डी.वाय. पाटील कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार ‘घरोघरी तिरंगा (हर घर तिरंगा)’ अभियानांतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने नानाविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये लोकसहभागावर विशेष भर देण्यात आला. असाच एक अभिनव उपक्रम ‘प्लास्टिकपासून स्वातंत्र्य’ या संकल्पनेनुसार नवी मुंबई महानगरपालिका आणि नेट झिरो एन्व्हायरो यांच्या माध्यमातून प्लास्टिक फॉर चेंज आणि कॅडनेट्झ यांच्या सहकार्याने स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर दि. १३ व १४ ऑगस्ट रोजी राबविण्यात आला. या उपक्रमामध्ये डी.वाय. पाटील महाविद्यालय, बेलापूर कॅम्पसच्या २००हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.




सामूहिक बांधिलकीचे प्रतिक म्हणून ६ X ९ फूट आकाराच्या शुभ्र कॅनव्हासवर तिरंग्याचे प्रतीक म्हणून तीन रंगात विद्यार्थ्यांच्या हातांचे ठसे उमटविण्यात आले.यावेळी प्रशिक्षित स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सिंगल यूज प्लास्टिकचा वापर टाळणे, तसेच प्लास्टिकचा पुनर्वापर करणे आणि प्लास्टिकवर पुनर्प्रक्रिया करणे याविषयी माहिती दिली व प्रबोधन केले. यावेळी “मी सिंगल यूज प्लास्टिकचा वापर करणार नाही, मी प्लास्टिक कचऱ्याचे योग्य वर्गीकरण करेन आणि इतरांनाही यासाठी प्रेरित करेन” याची प्रतिज्ञा उपस्थितांनी घेतली व त्यादृष्टीने कार्यवाही करण्याचा निश्चय करण्यात आला.

तिरंगी रंगातील हातांचे ठसे उमटवलेला हा मोठा कॅनव्हास स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात आणण्यात आला होता. ध्वजारोहणानंतर महापौर सुजाता पाटील, आयुक्त डॉ. कैलास शिंदे आणि इतर मान्यवरांनी त्याचे निरीक्षण करून युवकांनी राबविलेल्या या वेगळ्या उपक्रमाचे कौतुक केले.

# कीटकजन्य आजारांविरोधात पनवेल महानगरपालिकेची विशेष बैठक

## महापौरांच्या अध्यक्षतेखाली स्वच्छता आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीत मलेरिया, डेंग्यूसह कीटकजन्य आजारांचा प्रभावी प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कीटकजन्य आजार नियंत्रण कार्यक्रमाची आढावा बैठक बुधवारी (दि.१९) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आली.



या बैठकीस उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे, प्रभाग समिती 'अ' सभापती रवींद्र भगत, प्रभाग समिती 'ब' सभापती मधू पाटील, प्रभाग समिती 'क' सभापती रवींद्र जोशी, प्रभाग समिती 'ड' सभापती अजय बहिरा, महापालिका सदस्य, नगरसेवक-नगरसेविका, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्यासह स्वच्छता निरीक्षक व आरोग्य विभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी महापौर नितीन पाटील यांनी आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर स्वच्छतेला विशेष प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या. त्यासाठी विशेष स्वच्छता व सखोल साफसफाईच्या मोहिमा राबवाव्यात. रिकामे भूखंड, बांधकामस्थळे तसेच पाणी साचण्याची शक्यता असलेल्या ठिकाणांचे नियमित सर्वेक्षण करून प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. धूरफवारणी व स्वच्छता मोहिमा राबविताना संबंधित प्रभागातील महापालिका सदस्यांचे सहकार्य घ्यावे. साथीचे आजार पसरणार नाहीत यासाठी आरोग्य विभागाने विशेष दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

सभागृह नेते प्रकाश बिनेदार यांनी पावसाळ्यात निर्माण होणारी डासांची उत्पत्तीस्थळे शोधून त्या ठिकाणी जंतुनाशक व अळीनाशक फवारणी वाढविण्याच्या सूचना दिल्या. तसेच कीटकजन्य आजार नियंत्रण कार्यक्रमाबाबत नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करण्यावर भर देण्याचे त्यांनी सांगितले. विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी साथीचे आजार पसरण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना दिल्या. महापालिकेच्या वतीने कीटकजन्य आजार नियंत्रणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांची सविस्तर माहिती मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली.

बैठकीच्या सुरुवातीस कार्यक्रमाची प्रस्तावना व आभार उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी मानले.

**मलेरिया टाळण्यासाठी...**

-घराभोवती पाणी साचू देऊ नये.
-डबकी बुजवावीत किंवा त्यातील पाण्याचा निचरा करावा.
-खिडक्यांना डास प्रतिबंधक जाळ्या बसवाव्यात.
-पूर्ण बाह्यांचे कपडे परिधान करावेत.
-डासांपासून संरक्षण करणाऱ्या क्रीमचा वापर करावा.
-मच्छरदाणीचा वापर करावा.
-डासांपासून संरक्षण देणाऱ्या कॉइल्सचा वापर करावा.
-कोणताही ताप अंगावर काढू नये; तातडीने वैद्यकीय सल्ला घ्यावा.
-खराब टायर, फेकून दिलेली शहाळी, डबे आदींमध्ये पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी.
-हिवतापरोधक औषधे केवळ डॉक्टरांच्या सल्ल्यानेच घ्यावीत.

**डेंग्यू टाळण्यासाठी...**

-घरातील पाण्याची भांडी व्यवस्थित झाकून ठेवावीत.
-घरातील किंवा घराभोवती नळगळती होणार नाही याची काळजी घ्यावी.
-फुलदाण्यांमधील पाणी नियमितपणे, शक्यतो दिवसाआड बदलावे.
-इमारतीवरील पाण्याच्या टाक्या व्यवस्थित झाकून ठेवाव्यात.
-खिडक्यांना जाळ्या बसवाव्यात.
-घराभोवतीचा परिसर स्वच्छ व कोरडा ठेवावा.

# 'आरटीएचएसव्ही'च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षेत्रभेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी आययूसीएए (Inter-University Centre for Astronomy and Astrophysics), बेली प्लांट आणि मॅप्रो गार्डन या ठिकाणांना भेट दिली. या शैक्षणिक भेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील ज्ञानासोबत प्रत्यक्ष अनुभवातून विविध विषयांची माहिती मिळवून देणे हा होता.

आययूसीएए येथे विद्यार्थ्यांना खगोलशास्त्र व खगोलभौतिकी क्षेत्रातील संशोधन, विविध वैज्ञानिक उपकरणे आणि वैज्ञानिक विश्वाविषयीची माहिती जाणून घेण्याची संधी मिळाली. तसेच बेली प्लांटला भेट देताना विद्यार्थ्यांनी औद्योगिक उत्पादनाची प्रक्रिया, यंत्रसामग्री, कार्यपद्धती आणि सुरक्षिततेच्या विविध बाबींची प्रत्यक्ष माहिती घेतली.

मॅप्रो गार्डनमध्ये विद्यार्थ्यांनी फळप्रक्रिया, विविध खाद्यपदार्थांची निर्मिती, पॅकेजिंग व उत्पादन व्यवस्थापनाबाबत प्रत्यक्ष माहिती घेतली. शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानासोबत प्रत्यक्ष अनुभव मिळाला. निरीक्षणशक्ती, जिज्ञासा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्याच्या दृष्टीने ही भेट विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व आनंददायी ठरली. विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक सहलीचा आनंद घेत विविध अनुभव आत्मसात केले.



# नवीन पनवेलमध्ये ६०० ग्रॅम गांजा जप्त; दोघांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल शहरातील श्रेयस हॉस्पिटललगतच्या झोपडपट्टीत गांजाची विक्री करणाऱ्या दोन तरुणांना नवी मुंबई अंमली पदार्थविरोधी पथकाने सापळा रचून अटक केली. पोलिसांनी संबंधित ठिकाणाहून सुमारे ६०० ग्रॅम गांजा जप्त केला असून या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांना श्रेयस हॉस्पिटललगतच्या झोपडपट्टीतून गांजाची विक्री होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार अंमली पदार्थविरोधी पथकाने परिसरावर लक्ष ठेवून कारवाईची तयारी केली. मंगळवारी सापळा रचून गांजाची विक्री करणाऱ्या दोन तरुणांना ताब्यात घेण्यात आले. झडती घेतली असता तेथे ६०० ग्रॅम गांजा आढळून आला.

## निवडक

### सुकापूरमध्ये घरफोडी

**नवीन पनवेल** : सुकापूर येथील घरात चोरी करत चोराने १२ लाख ३० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरोधात १७ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नंदिनी दळवी (६६) या साक्षी पार्क, सुकापूर येथे राहतात. त्या कुटुंबीयांसोबत १६ ऑगस्ट रोजी घरामध्ये झोपल्या होत्या. यावेळी चोराने घराच्या बेडरूममधील उघड्या असलेल्या काचेच्या खिडकीतून आत प्रवेश केला. खिडकीजवळ ठेवलेली पर्स आणि त्यामध्ये ठेवलेले १२ लाख ३० हजार रुपये किमतीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. खांदेश्वर पोलिसांनी अज्ञात चोराविरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### पलायन केलेल्या आरोपीस अटक

**पनवेल** : न्यायालयातून आरोपीला हजर करून पोलीस ठाण्यात आणले असता कळंबोली पोलीस ठाण्यातून आरोपी पळाल्याची घटना घडली. कळंबोली पोलिसांनी आरोपीला पुणे येथून ताब्यात घेतले. चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी इरफान मोहम्मद जाकीर शेख मन्सुरी उर्फ मँगो (१९, रा. रोडपाली गाव) याला कळंबोली पोलिसांनी अटक केली होती. या आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पोलीस कोठडी दिली. दुपारी चारच्या सुमारास त्याला लॉकपमध्ये ठेवत असताना तो तेथून पळून गेला. आरोपी पळून गेल्याने त्याला पकडण्याचे आव्हान पोलिसांसमोर होते. पोलिसांच्या पथकाने पुणे येथून या आरोपीला ताब्यात घेतले असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांनी दिली. आरोपी लघुशंकेला जातो असे सांगून पळून गेल्याचे त्यांनी सांगितले.

### उरणमध्ये सामाजिक उपक्रम

**उरण** : अखिल बुरुड समाज प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य आणि लायन्स क्लब ऑफ उरण यांच्या वतीने १६ ऑगस्ट रोजी बांबू रोपण, शैक्षणिक साहित्य वाटप तसेच ज्येष्ठ समाज बांधवांना छत्र्यांचे वितरण करण्याचा कार्यक्रम पार पडला. या सामाजिक उपक्रमात बांबूची रोपे लावून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ समाज बांधवांना छत्र्या देण्यात आल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानच्या उरण कार्यकारणीने विशेष परिश्रम घेतले. तालुकाप्रमुख राकेश किल्लेकर, उपतालुकाप्रमुख सिद्धेश गायकवाड, प्रियांका साळुंखे, सचिव किशोर गायकवाड, सहसचिव मनोज सोनार, रेखा नागे, खजिनदार कल्पेश खैरे, सहखजिनदार संजीवनी गायकवाड, समिता गायकवाड या सर्व सदस्यांनी आपापली जबाबदारी चोखपणे पार पाडून कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले.



# खारघर हिल महापौर मॅरेथॉनच्या मार्गाची महापौर आणि आयुक्तांनी केली पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रविवारी (दि. २३) आयोजित करण्यात आलेल्या 'खारघर हिल महापौर मॅरेथॉन'च्या पूर्वतयारीला वेग आला असून बुधवारी (दि. १९) महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे यांच्यासह महापालिका अधिकारी व संबंधित यंत्रणांनी मॅरेथॉन मार्गाची पाहणी केली. देशातील पूर्ण ४२ किलोमीटर अंतराची पहिली हिल महापौर मॅरेथॉन म्हणून या स्पर्धेकडे पाहिले जात आहे.

यावेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, शहर अभियंता राजेश कर्डिले, मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, आरोग्य विभागप्रमुख अनिल कोकरे, प्रभारी अधीक्षक जितू मढवी यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. मॅरेथॉन मार्गावरील स्वच्छता, सुरक्षितता तसेच पावसाळी हवामानाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा यावेळी आढावा घेण्यात आला. डोंगराळ भागातील संभाव्य दरड कोसळणे, दगड घसरणे, झाडे पडणे यांसारख्या जोखमींचा विचार करून आवश्यक खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच स्पर्धेच्या सुरळीत व्यवस्थापनासाठी स्वयंसेवक व सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्याबाबतही चर्चा करण्यात आली.



आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त AIMS प्रमाणकामुळे या मॅरेथॉनला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पुढील वर्षापासून या स्पर्धेला जागतिक स्तरावर अधिक व्यापक मान्यता मिळून देश-विदेशातील धावपटूंना आकर्षित करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. यामुळे पनवेल महापालिकेची राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र ओळख निर्माण होण्यास मदत होणार आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने मॅरेथॉनमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन महापौर नितीन पाटील यांनी केले आहे.

गर्दीच्या रस्त्यांऐवजी डोंगर, टेकड्या, हिरवळ आणि स्वच्छ हवेच्या सान्निध्यात धावण्याचा अनोखा अनुभव धावपटूंना या मॅरेथॉनच्या माध्यमातून मिळणार आहे. पनवेल हे रायगड, कोकण तसेच नाशिक विभागातील धावपटूंसाठी मध्यवर्ती ठिकाण असल्याने प्रवासाचा वेळ आणि खर्चही कमी होणार आहे. त्यामुळे धावपटूंनी 'खारघर हिल महापौर मॅरेथॉन'ला पसंती द्यावी, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

**स्पर्धेचे प्रकार**

४२ कि.मी. फुल मॅरेथॉन, २१ कि.मी. हाफ मॅरेथॉन, १० कि.मी. रन, ५ कि.मी. रन, ३ कि.मी. फन रन (दिव्यांग व्यक्ती, लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिक)

**मार्गाची माहिती**

३ कि.मी. मॅरेथॉनसाठी मार्ग सेंट्रल पार्क ग्रामविकास भवन विश्वज्योत प्रीस्कूल यू टर्न ग्रामविकास भवन सेंट्रल पार्क ५ कि.मी. मॅरेथॉनसाठी मार्ग सेंट्रल पार्क ग्रामविकास भवन मुर्बी मेट्रो स्टेशन यू टर्न ग्रामविकास भवन - सेंट्रल पार्क १० कि.मी. मॅरेथॉनसाठी मार्ग सेंट्रल पार्क ग्रामविकास भवन उत्सव चौक बेलपाडा मेट्रो स्टेशन - आरबीआय कॉलनी मेट्रो स्टेशन यू टर्न बेलपाडा मेट्रो स्टेशन- उत्सव चौक ग्रामविकास भवन सेंट्रल पार्क २१ कि.मी. मॅरेथॉनसाठी मार्ग सेंट्रल पार्क स्टेशन - RBI कॉलनी मेट्रो स्टेशन चाफेवाडी मेट्रो स्टेशन- उत्सव चौक ग्रामविकास भवन ग्रामविकास भवन उत्सव चौक बेलपाडा मेट्रो फणसवाडी यू टर्न RBI कॉलनी मेट्रो स्टेशन- बेलपाडा सेंट्रल पार्क.

**४२ किमी मॅरेथॉनसाठी मार्ग**

सेंट्रल पार्क ग्रामविकास भवन मुर्बी जंकशन यू टर्न-ग्रामविकास भवन -उत्सव चौक-बेलपाडा मेट्रो स्टेशन-RBI कॉलनी मेट्रो स्टेशन चाफेवाडी -फणसवाडी यू टर्न -RBI कॉलनी मेट्रो स्टेशन-बेलपाडा मेट्रो स्टेशन-उत्सव चौक गोल्फ कोर्स रोड यू टर्न ग्रामविकास भवन- गुरुद्वारा -रांजणपाडा खारघर फुटबॉल स्टेडियम तळोजा जेल रोड टाटा मेमोरियल सेंटर यू टर्न- तळोजा जेल रोड-खारघर फुटबॉल स्टेडियम रांजणपाडा मुर्बी जंकशन- विबग्योर शाळा यू टर्न-मुर्बी जंक्शन- रांजणपाडा-गुरुद्वारा -सेंट्रल पार्क.

# मॉडर्न स्कूलमधील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या मॉडर्न स्कूल, वाशी येथील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेतील प्राथमिक व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेची व मेहनतीची छाप उमटवत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये इयत्ता चौथी प्राथमिक मराठी माध्यमातील अन्वी विनायक पाटील व सिया नंदू नाकते तसेच इयत्ता सातवी मराठी माध्यमातील अजिंक्य भैरवनाथ भोराडे यांचा समावेश आहे. तसेच इयत्ता चौथी प्राथमिक इंग्रजी माध्यमातील सूर्या दास याने उत्तेजनार्थ यश संपादन केले आहे.

या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवून आपल्या अभ्यासातील सातत्य, जिद्द आणि मेहनतीचे दर्शन घडविले. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक व मित्रपरिवाराकडून सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# खारघरच्या इस्कॉन मंदिरात जन्माष्टमीनिमित्त भव्य सोहळा

**पनवेल : वार्ताहर**

खारघर येथील इस्कॉन श्री श्री राधा मदनमोहनजी मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी २०२६ निमित्त भव्य आध्यात्मिक व सांस्कृतिक उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. २३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरदरम्यान विविध धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिराचे अध्यक्ष डॉ. सुर दास यांच्या नेतृत्वाखाली हा उत्सव साजरा केला जाणार आहे.

उत्सवाची सुरुवात २३ ते २८ ऑगस्टदरम्यान होणाऱ्या झुलन यात्रेने होणार आहे. दररोज सायंकाळी ७ ते रात्री ९ या वेळेत कीर्तन, भजन आणि आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २८ ऑगस्ट रोजी बलराम जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम होणार असून, त्यानंतर ४ सप्टेंबरपर्यंत श्रावण उत्सव साजरा केला जाणार आहे. या कालावधीत नामवंत वयांकडून श्रीकृष्ण कथा आणि आध्यात्मिक प्रवचने होणार आहेत.४ सप्टेंबर रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमीचा मुख्य सोहळा होणार असून मंदिर दिवसभर भाविकांसाठी खुले राहणार आहे.



सायंकाळी ५ वाजता कलश दात्यांसाठी विशेष कलश अभिषेक, रात्री १ वाजता महाअभिषेक, त्यानंतर मध्यरात्री महाआरती, कीर्तन आणि प्रसाद वितरण होणार आहे. दाते आणि आजीवन सदस्यांसाठी सदस्यत्व कार्डच्या आधारे विशेष दर्शनाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार आहे.५ सप्टेंबर रोजी इस्कॉनचे संस्थापक-आचार्य श्रील ए. सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांचा १३०वा प्रकटदिन साजरा करण्यात येणार आहे. तसेच ७ सप्टेंबर रोजी परमपूज्य गोपाळ कृष्ण गोस्वामी महाराज यांची व्यासपूजा, तर १९ सप्टेंबर रोजी राधाष्टमीचा उत्सव होणार आहे.

मंदिराच्या उद्घाटनानंतर इस्कॉन नवी मुंबईकडून आध्यात्मिक कार्यक्रमांसोबत सामाजिक, आरोग्य आणि शैक्षणिक क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. संस्थेच्या माहितीनुसार आतापर्यंत ८० लाख डोना प्रसाद आणि २.५ लाख पोटभर जेवणाचे वितरण करण्यात आले आहे. तसेच ५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना भगवद्गीतेचे शिक्षण देण्यात आले असून विविध भागांत एक लाखांहून अधिक भगवद्गीता ग्रंथांचे वितरण करण्यात आले आहे.भक्तिवेदांत आयुर्वेदिक उपचार व संशोधन केंद्राच्या माध्यमातून आरोग्यसेवेचे उपक्रम सुरू असून, टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या सीटीआरईसीसोबत एकात्मिक रुग्णसेवेसाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. खारघर येथील इस्कॉन परिसरातील दशावतार मंदिर, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर आणि नव्याने सुरू करण्यात आलेली गोशाळा ही भाविकांसाठी आकर्षणाची केंद्रे ठरत आहेत. मुंबई आणि नवी मुंबईतील युवकांसाठी आतापर्यंत सात युवा महोत्सवांचे आयोजन करण्यात आले आहे.

दरम्यान, गर्दी नियंत्रणासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. स्थानिक पोलीस, स्वयंसेवक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, उत्सव समितीचे सदस्य आणि समाजसेवक यांच्या समन्वयातून गर्दी व्यवस्थापन केले जाणार असल्याचे उत्सव समितीचे अध्यक्ष अनिल मित्तल आणि सचिव राजेश तिवारी यांनी सांगितले. "श्रीकृष्ण जन्माष्टमी हा केवळ मंदिरातील उत्सव नसून समाजाला एकत्र आणण्याची, श्रीकृष्ण कथा ऐकण्याची, पवित्र नामांचा जप करण्याची आणि प्रसाद ग्रहण करण्याची संधी आहे. भगवान श्रीकृष्णांच्या अवताराचा उत्सव साजरा करण्यासाठी भाविकांनी कुटुंबीय आणि मित्रांसह सहभागी व्हावे," असे आवाहन इस्कॉन नवी मुंबई, खारघरचे अध्यक्ष डॉ. सुरा दास यांनी केले आहे.

## संपादकीय

# ट्रम्प यांच्याकडून कौतुक!

अमेरिकेसारख्या बलाढ्य आणि प्रगत राष्ट्राचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकताच भारताचा उल्लेख अमेरिकेतील निवडणूक सुधारणांसाठी आदर्श म्हणून केला. भारताच्या निवडणूक प्रक्रियेविषयी आंतरराष्ट्रीय स्तरावर असलेला विश्वासच ट्रम्प यांच्या या वक्तव्यातून दिसून येतो.

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतात नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीचा उल्लेख करत यात सुमारे ६४.६ कोटी भारतीय मतदारांनी मतदान केल्याचे, त्यापैकी एक टयांपेक्षाही कमी मतदारांनी टपालाद्वारे मतदान केल्याचे आणि प्रत्येक मतदाराकडे वैध छायाचित्रयुक्त ओळखपत्र असल्याचे नमूद केले. भारतीय निवडणूक व्यवस्थेचे अशाप्रकारे कौतुक करीत ट्रम्प यांनी अमेरिकेने आता 'द सेव्ह अमेरिका ॲक्ट' मंजूर करण्याची गरज आहे असे प्रतिपादन केले. भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी अमेरिकेतील निवडणुकीत वैध फोटो-आयडीशिवाय मतदान कसे होते असा प्रश्न उपस्थित केल्याचेही ट्रम्प यांनी यावेळी नमूद केले. भारताच्या निवडणूक व्यवस्थेचा आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा संदर्भ देत ट्रम्प यांनी केलेल्या या भाष्यावर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयानेही सकारात्मक प्रतिक्रिया दिली आहे. भारतीय निवडणूक यंत्रणेची विश्वासार्हता आणि भक्कमपणा जागतिक स्तरावर आधीच सिद्ध झालेला आहे असे परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवयाने म्हटले आहे. आपल्या संबंधित वक्तव्यात ट्रम्प यांनी उल्लेख केलेला 'सेव्ह ॲक्ट' म्हणजे अमेरिकेतील संघीय निवडणुकांमध्ये केवळ पात्र अमेरिकन नागरिकांचीच नोंदणी आणि मतदान सुनिश्चित करण्यासाठी प्रस्तावित असलेला 'सेफगार्ड अमेरिकन वोटर एलिजिबिलिटी ॲक्ट' हा कायदा आहे. त्यानुसार मतदार नोंदणी करताना नागरिकत्वाचा दस्तावेजी पुरावा सादर करणे आवश्यक ठरणार आहे. प्रस्तावित कायद्यात वैध अमेरिकन पासपोर्ट, नागरिकत्व दर्शविणारे रिअल आयडी, विशिष्ट सरकारी ओळखपत्रे, जन्म दाखला किंवा नागरिकत्व प्रमाणपत्र यांसारखी कागदपत्रे पुरावे म्हणून नमूद आहेत. याशिवाय संघीय निवडणुकीत मतदान करताना वैध फोटो-ओळखपत्राची अट घालण्याची तरतूदही प्रस्तावित आहे. मात्र कागदपत्रे उपलब्ध नसलेल्या नागरिकांसाठी पर्यायी पडताळणीची प्रक्रियाही विधेयकात ठेवण्यात आली आहे. हा कायदा अद्याप अमेरिकेतील कायदेमंडळाच्या प्रक्रियेत आहे. ट्रम्प यांच्या या ताज्या विधानाच्या पार्श्वभूमीवर भारतात पुन्हा एकदा ईव्हीएमचा मुद्दा उपस्थित केला गेला. काही विरोधी नेत्यांना ही विचित्र राजकीय सवयच लागली आहे. निवडणूक निकाल आपल्या बाजूने लागला तर जनतेचा कौल म्हणायचे आणि पराभव झाला तर ईव्हीएम संशयास्पद असल्याची बोंब ठोकायची. परंतु आरोप आणि पुरावा यात मोठा फरक असतो. भारतीय ईव्हीएम एक स्वतंत्र यंत्रणा आहेत. त्यांच्यासोबत व्हीव्हीपॅटची व्यवस्था आहे. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत तपासणी, व्हीव्हीपॅटची पडताळणी अशा अनेक सुरक्षाव्यवस्था आपल्याकडे आहेत. त्यामुळे प्रत्येक पराभवानंतर पुराव्याविना ईव्हीएमला दोष देणे हा मतदारांच्या निर्णयाचाही अपमान आहे. आज अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष भारतातील मतदार ओळख व्यवस्थेचा दाखला देऊन आपल्या देशातील निवडणूक व्यवस्था अधिक कठोर करण्याची मागणी करत असताना भारतातील काही नेते मात्र आपल्याच निवडणूक व्यवस्थेविषयी संशयाचे सावट निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहेत. भारतीय लोकशाहीची खरी ताकद केवळ निवडणूक जिंकण्यात नाही तर कोट्यवधी मतदारांचा कौल स्वीकारण्यात आहे. त्यामुळे निव्वळ आपल्या राजकीय सोयीसाठी ईव्हीएमवर संशय घेण्यापेक्षा, जनतेच्या निर्णयाचा आदर करून पुढील निवडणुकीत अधिक चांगल्या राजकीय कामगिरीसह मतदारांसमोर जाणे हाच खऱ्या लोकशाहीचा मार्ग आहे.**

# जलसंधारणातून घडवूया बारमाही हिरवा महाराष्ट्र



पाऊस पडतो तेव्हा आपण आनंदतो; पण तोच पाऊस वाहून जातो तेव्हा त्याच्याकडे दुर्लक्ष करतो. आकाशातून पडणारा प्रत्येक थेंब जमिनीवर थांबविणे, तो जमिनीत मुरविणे, भूजलपातळी वाढविणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे, हीच आजच्या महाराष्ट्राची सर्वात मोठी गरज आहे. म्हणूनच यंदा २१ ऑगस्ट रोजी साजरा होणारा जलसंधारण दिन हा केवळ शासकीय कार्यक्रम न राहता लोकसहभागाची नवी सुरुवात ठरली पाहिजे.

शासनाने माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जन्मदिनी, म्हणजेच २१ ऑगस्टला दरवर्षी जलसंधारण दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामागे जलसंधारण क्षेत्रातील सुधाकरराव नाईक यांच्या योगदानाचे स्मरण आणि जलसंधारणाची लोकचळवळ अधिक व्यापक करण्याचा उद्देश आहे. या दिवशी जलपूजन, विविध जलसंधारण कामांचे भूमिपूजन व लोकार्पण, श्रमदान, जनजागृती, उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव आदी उपक्रम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

याच पार्श्वभूमीवर राज्यात जलसंधारण दिनाच्या निमित्ताने आठवडाभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

स्वातंत्र्य दिनाच्या ध्वजारोहण कार्यक्रमात शासकीय कार्यालयांमध्ये मृद व जलसंधारणाची शपथ घेऊन या लोकचळवळीची सुरुवात करण्यात आली. २१ ऑगस्ट रोजी महा वॉकेथॉनवॉक फॉर वॉटर, रील्स स्पर्धा, जलपूजन, श्रमदान आणि जनजागृतीचे उपक्रम नागरिकांना सहभागी करून घेण्यासाठी आयोजित केले जात आहेत.

### जलसंधारण म्हणजे काय?

पावसाचे पाणी शक्य तितक्या मोठ्या प्रमाणात जमिनीवर अडविणे, त्याचा वेग कमी करणे, जमिनीत मुरविणे, भूजलाचे पुनर्भरण करणे, जलस्रोतांची साठवण क्षमता वाढविणे आणि उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे, याला व्यापक अर्थाने जलसंधारण म्हणता येईल. जलसंधारण म्हणजे केवळ बंधारा बांधणे नव्हे. पाण्याचा प्रत्येक थेंब जिथे पडतो, तिथेच त्याचा अधिकाधिक उपयोग करणे, ही त्यामागची मूलभूत संकल्पना आहे.

महाराष्ट्रासाठी ही बाब अधिक महत्त्वाची आहे. राज्याच्या भौगोलिक क्षेत्रापैकी सुमारे ५२ टक्के क्षेत्र अवर्षणप्रवण आहे. पावसाचे भौगोलिक आणि कालिक वितरण असमान आहे. काही भागात अतिवृष्टी होते, तर काही भागात पावसाची प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे 'पाणी आहे, पण योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी नाही' हीच मोठी समस्या आहे. जलसंधारणातून या विसंगतीवर मात करता येते.

### महाराष्ट्राच्या जलसंधारणाची मुळे

महाराष्ट्रात जलसंधारणाची परंपरा नवी नाही. गावागावातील तलाव, बंधारे, पाझर तलाव, विहिरी आणि पारंपरिक जलव्यवस्थापन ही ग्रामीण जीवनाची पूर्वापार साधने आहेत. ही परंपरा थेट छत्रपती शिवरायांचा काळापर्यंत जाते. गड किल्ल्यावर पावसाचे पाणी साठवण्याची मोठी परंपरा आहे. यावर महाराष्ट्राने शिवकालीन पाणी साठवण योजनाही सुरु केली आहे. आधुनिक शासकीय पातळीवर मात्र जलसंधारणाला स्वतंत्र संस्थात्मक दिशा मिळाली ती स्वतंत्र जलसंधारण विभागाच्या स्थापनेमुळे. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनीही १९७२च्या दुष्काळानंतर जलसंधारण माध्यमातून 'जलक्रांन्ती' घडवून आणली होती. त्यांनी पाणी अडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबवून पाणलोट क्षेत्र वाढवले मोठ्या धरणांपेक्षा बॅरेजेसला महत्व दिले

### जलयुक्त शिवारातून नव्या पर्वाला सुरुवात

जलसंधारणाला मोठ्या प्रमाणावर लोकचळवळीचे स्वरूप देण्याच्या दृष्टीने २०१४नंतरचा काळ महत्त्वाचा ठरतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात ५ डिसेंबर २०१४च्या शासन निर्णयानुसार जलयुक्त शिवार अभियान सुरू करण्यात आले. या योजनेतून पुढे हजारो हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली. लक्षावधी टीएमसी पाणी साठा निर्माण झाला. हजारो गावे पाणीदार झाली. त्यांचा शाश्वत विकास झाला.

आज जलयुक्त शिवार २.०च्या माध्यमातूनही जलसंधारण, जलसाक्षरता, लोकसहभाग आणि उपलब्ध भूजलाच्या शाश्वत वापरावर भर दिला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही स्पष्टपणे सांगितले आहे की, महाराष्ट्राच्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंधारणातून परिवर्तन घडविणे आवश्यक आहे.

### योजनांची ताकद, लोकसहभागाची साथ

महाराष्ट्राने जलसंधारणासाठी अनेक मार्ग स्वीकारले आहेत. मागेल त्याला शेततळे योजनेला २०१६मध्ये सुरुवात करून शेतकऱ्यांना स्वतःची संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करण्याची संधी देण्यात आली.

गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार ही संकल्पना तर जलसंधारण आणि शेती यांची सांगड घालणारी आहे. धरणातील गाळ काढल्यामुळे जलाशयाची साठवण क्षमता वाढते आणि तोच गाळ शेतात टाकल्यामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होते. २०२४मध्ये ही योजना कायमस्वरूपी राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय विहीर पुनर्भरण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, नाला खोलीकरण व रुंदीकरण, सिमेंट बंधारे, गॅबियन बंधारे, वनराई बंधारे, सलग समतल चर, शेततळी, जलस्रोतांमधील गाळ काढणे, बांधावर वृक्ष व बांबू लागवड अशा असंख्य उपाययोजना राज्यात राबविल्या जात आहेत.

### देशातील प्रेरणादायी उपक्रम

राजस्थानच्या अलवरमध्ये पारंपरिक 'जोहड' या पावसाच्या पाण्याच्या साठवण संरचनांचे पुनरुज्जीवन करून गावकऱ्यांनी जलव्यवस्थापनाचे प्रभावी मॉडेल उभे केले. जलतज्ज्ञ आणि 'वॉटर मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाणारे राजेंद्र सिंह यांच्या नेतृत्वाखालील लोकसहभागातून कोरड्या प्रदेशात जलस्रोत पुनरुज्जीवित झाले आणि अरवरीसारख्या नद्यांना पुन्हा प्रवाह मिळाला.

महाराष्ट्रात राळेगणसिद्धी आणि हिवरे बाजार ही दोन उदाहरणे तितकीच प्रेरणादायी आहेत. राळेगणसिद्धीत नाला बांध, गली प्लगिंग, समतल चर, पाझर तलाव आणि लोकसहभागातून दुष्काळी गावाचा कायापालट झाला. हिवरे बाजारने पाण्याचे बजेट, पिकांचे नियोजन, ठिबक सिंचन, भूजल पुनर्भरण आणि जलसंधारण यांची सांगड घालत जलसुरक्षेचे आदर्श मॉडेल निर्माण केले.

### नागरिकांनी काय करायचे?

शासन आपले काम करीत आहे, परंतु जलसंधारणाची खरी यशोगाथा नागरिकांच्या सहभागाशिवाय पूर्ण होणार नाही. या पावसाळ्यात प्रत्येक नागरिकाने आपल्या घराच्या छतावरील पाणी साठविण्याची किंवा जमिनीत मुरविण्याची व्यवस्था करावी. गावांनी पाण्याचा ताळेबंद तयार करावा. शेतकऱ्यांनी शेततळी, बांधबंदिस्ती, विहीर पुनर्भरण, ठिबक-सिंचन आणि पिकांच्या पाण्याच्या गरजेनुसार नियोजन करावे. गावातील नाले, तलाव, बंधारे आणि पारंपरिक जलस्रोत यांची स्वच्छता व देखभाल करावी. शक्य तेथे श्रमदान करावे. पाणी वाया जाणार नाही, याची प्रत्येक कुटुंबाने काळजी घ्यावी.आणि पावसाळा सुरु आहे. वृक्ष लागवडीत कुटूंबाने दरवर्षी एक या प्रमाणे वृक्ष लागवड करावी.

जलसंधारण हा केवळ मृद व जलसंधारण विभागाचा विषय नाही; तो कृषीचा, ग्रामविकासाचा, पर्यावरणाचा, अर्थव्यवस्थेचा आणि भविष्यातील पिढ्यांचा विषय आहे. कारण पाणी वाचले तर शेती वाचेल, शेती वाचली तर गावाची अर्थव्यवस्था वाचेल आणि गाव समृद्ध झाले तर महाराष्ट्र समृद्ध होईल.

म्हणून २१ ऑगस्टचा जलसंधारण दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा दिवस न राहता प्रत्येकाच्या मनात एक संकल्प निर्माण करणारा दिवस ठरू दे. चला जलसंधारणातून 'बारमाही हिरवा महाराष्ट्र' घडवूया!

**–प्रवीण टाके**, उपसंचालक (माहिती)

## बदलते तंत्रज्ञान

# एअरटेलने काही लोकप्रिय प्लॅन्समध्ये केले बदल

देशातील आघाडीची टेलिकॉम कंपनी एअरटेलने आपले काही प्रीपेड रिचार्ज प्लॅन बदलले असून, काही लोकप्रिय प्लॅन बंदही केले आहेत. कंपनीकडून २९९ चा प्लॅन बंद करण्यात आला आहे, तर दुसरीकडे ३४९ रुपयांचा नवा प्लॅनही एअरटेलनं लाँच केलाय.





मीडिया रिपोर्ट्सनुसार एअरटेलने २९९, ५५९, ६१९ आणि ६४९ रुपयांचे काही लोकप्रिय प्रीपेड प्लॅन बंद केले आहेत. हे प्लॅन आता कंपनीच्या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध नसल्याचे दिसून येते. यामध्ये सर्वाधिक चर्चा २९९ रुपयांच्या प्लॅनची आहे. या प्लॅनमध्ये २८ दिवसांची वैधता आणि दररोज १ ते १.५ जीबी डेटा मिळत होता.

हा प्लॅन बंद केल्यानंतर दररोज डेटा आणि अनलिमिटेड कॉलिंग देणारा एअरटेलचा सर्वात स्वस्त पर्याय आता ३४९ रुपयांचा झाला आहे. त्यामुळे ग्राहकांचा सुरुवातीचा रिचार्ज खर्च थेट ५० रुपयांनी वाढला आहे.

एअरटेलच्या ५६ दिवसांच्या वैधतेच्या डेली डेटा पॅकची किंमतही वाढवण्यात आली आहे. यापूर्वी या प्लॅनसाठी ५७९ रुपये मोजावे लागत होते. आता त्याची किंमत ६१९ रुपये करण्यात आली आहे. म्हणजेच या प्लॅनसाठी ग्राहकांना आता ४० रुपये अधिक खर्च करावे लागणार आहेत.

### ८४ दिवसांच्या प्लॅनसाठीही जास्त पैसे मोजावे लागणार

८४ दिवसांच्या लॉन्ग-टर्म डेली डेटा प्लॅनची किंमतही वाढवण्यात आली आहे. पूर्वी ८५९ रुपये असलेली किंमत आता ८९९ रुपये करण्यात आली आहे. काही विशिष्ट भागांमध्ये किंमत वाढवण्यासोबतच बोनस फायदे कमी करण्यात आल्याचे किंवा एकूण डेटा मर्यादेत बदल करण्यात आल्याचेही सांगितले जात आहे.

### ग्राहकांच्या खिशावर वाढणार भार

एअरटेलने केलेल्या या बदलांमुळे विशेषतः दररोज डेटा आणि अनलिमिटेड कॉलिंगची सुविधा वापरणाऱ्या प्रीपेड ग्राहकांचा खर्च वाढणार आहे. कंपनीने काही एंट्री-लेव्हल अनलिमिटेड प्लॅन बंद करण्यास सुरुवात केली आहे. त्याचबरोबर काही मिड-रेंज प्लॅनची वैधता आणि फायदे यामध्येही बदल करण्यात आले आहेत. यामुळे दररोज डेटा सेवा सुरू ठेवण्यासाठी ग्राहकांना आता पूर्वीपेक्षा जास्त रक्कम खर्च करावी लागू शकते. एअरटेलने या बदलांबाबत अद्याप अधिकृत स्पष्टीकरण दिलेले नसल्याने, ग्राहकांनी रिचार्ज करण्यापूर्वी उपलब्ध प्लॅन आणि त्यातील फायदे तपासणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# विज्ञानवादाचे उपासक डॉ. नरेंद्र दाभोलकर



## निमित्त

नरेंद्र अच्युत दाभोलकर हे मराठी बुद्धिवादी, विज्ञानवादी, समाजसुधारक व सामाजिक कार्यकर्ते होते. अघोरी सामाजिक प्रथा व अंधश्रद्धांच्या निर्मूलनासाठी अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती या संघटनेसोबत काम करू लागले. अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही १९८२ साली श्याम मानव यांनी स्थापन केली, परंतु १९८९ साली नरेंद्र दाभोळकरांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती या नावाची वेगळी संघटना सुरू केली. ते स्वतः या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष होते. त्यांची २० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरानजीक असलेल्या ओंकारेश्वर पुलावर अज्ञातांनी चार गोळ्या झाडून हत्या केली.

वडील अच्युत लक्ष्मण दाभोलकर व आई ताराबाई यांच्या दहा अपत्यांपैकी नरेंद्र हे सर्वांत धाकटे होय. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील माहुली या गावी झाला. दाभोलकरांनी शैला यांच्याबरोबर विवाह केला. त्यांना मुक्ता आणि हमीद ही अपत्ये आहेत. सामाजिक कार्यकर्ते हमीद दलवाई यांच्या नावावरून त्यांनी आपल्या मुलाचे नाव ठेवले. लग्नसोहळा व त्यामधील खर्च यावर ते सतत टीका करीत. आपल्या दोन्ही मुलांचे विवाह साध्या पद्धतीने केले.


नरेंद्र दाभोलकरांचे माध्यमिक शिक्षण साताऱ्यातील न्यू इंग्लिश स्कूल शाळेत झाले. त्यांनी सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयातून विज्ञान शाखेतील उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. ते राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरचे उत्तम कबड्डीपटू म्हणून क्रीडाजगतात प्रसिद्ध होते. कबड्डीवर उपलब्ध असलेले एकमेव शास्त्रशुद्ध पुस्तकही त्यांनी लिहिले. कबड्डीतील योगदानासाठी त्यांना मानाचा शिवछत्रपती पुरस्कारही मिळाला. बाबा आढाव यांच्या एक गाव एक पाणवठा या चळवळीत त्यांचा सक्रिय सहभाग होता. त्यानंतर त्यांनी श्याम मानव यांच्या अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीमध्ये कार्य सुरू केले, पण नंतर त्यापासून वेगळे होऊन त्यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती स्थापन केली. साने गुरुजींनी स्थापन केलेल्या साधना या लोकप्रिय साप्ताहिकाचे ते डिसेंबर १९९८पासून मृत्यूपर्यंत संपादक होते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी, परंपरा मोडीत काढण्यासाठी लोकप्रबोधन करण्यात येते. महाराष्ट्र जादूटोणाविरोधी विधेयक विधिमंडळात मंजूर व्हावे यासाठी दाभोलकर गेल्या काही वर्षांपासून कार्यरत होते. त्यांची २० ऑगस्ट २०१३ रोजी पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरानजिक असलेल्या ओंकारेश्वर पूल येथे अज्ञातांनी गोळ्या झाडून हत्या केली. पुण्यामध्ये असताना ते रोज सकाळी घरापासून ते बालगंधर्व रंगमंदिरापर्यंत फिरायला जात असत.

२० ऑगस्ट रोजी घरून निघाल्यावर दाभोलकर पुलावर असताना सकाळी साडेसातच्या सुमारास त्यांच्यावर दोन अज्ञात हल्लेखोरांनी चार गोळ्या झाडल्या. त्यामुळे दाभोलकर घटनास्थळीच कोसळले. पोलिसांनी त्यांना ससून रुग्णालयात हलविले, मात्र रुग्णालयातील डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

(साभार विकिपीडिया)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# मासिक पाळीत कमी ब्लड फ्लो? आहारात हवे हे पदार्थ

दर महिन्याला येणारी मासिक पाळी हा महिलांच्या आयुष्यातील अविभाज्य भाग आहे. मासिक पाळीसंबंधित अनेकजणींना काही ना काही समस्या कायम असतात. आजच्या काळात चुकीची लाईफस्टाईल, जास्त ताण आणि अयोग्य आहार यामुळे महिलांना मासिक पाळीशी संबंधित अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. यामुळे पीसीओएस आणि पीसीओडीसारखे आजार होऊ शकतात, ज्यामध्ये मासिक पाळीचा रक्तप्रवाह कमी होण्याची समस्या येते.



मासिक पाळीदरम्यान रक्तप्रवाह योग्य पद्धतीने होत नाही किंवा काही जणींच्या बाबतीत ब्लड ग्लो अतिशय कमी होतो. जर ब्लड फ्लो योग्य पद्धतीने न झाल्यास या समस्येमुळे महिलांना अनेकदा थकवा, मूड स्विंग्स, चिडचिडेपणा, पाठदुखी, डोकेदुखी आणि पोटदुखीचा त्रास होतो. आपण आपल्या आहारात आणि खाण्यापिण्याच्या सवयीत बदल करून मासिक पाळीत होणारा ब्लड फ्लो सुधारू शकतो. यावर उपाय म्हणून जयपूर येथील एंजेलकेअर न्यूट्रिशन ॲण्ड वेलनेस सेंटरच्या संचालक, आहारतज्ज्ञ आणि पोषणतज्ज्ञ अर्चना जैन यांनी onlymyhealth.comला दिलेल्या मुलाखतीत मासिक पाळीतील रक्तप्रवाह सुधारण्यासाठी काय खावे याबद्दल अधिक माहिती सांगितली आहे.

हिरव्या पालेभाज्या : मासिक पाळीत योग्य पद्धतीने ब्लड फ्लो होण्यासाठी आपल्या आहारात, मेथी आणि पालक यांसारख्या हिरव्या पालेभाज्यांचा समावेश करा. याशिवाय बीटसारखी कंदमुळेदेखील आहारात नियमितपणे खावीत. या भाज्यांमध्ये भरपूर प्रमाणात लोह असते. यामुळे शरीरातील रक्तप्रवाह सुधारण्यास मदत होते.

फळे : संत्री, द्राक्षे, किवी, डाळिंब आणि लिंबू यांसारख्या व्हिटॅमिन-सी आणि लोहयुक्त फळांचा आहारात समावेश करावा.

सुकामेवा : अक्रोड, खजूर, मनुके आणि अंजीर यांसारख्या सुक्यामेव्याचा आहारात समावेश करावा. यामध्ये चांगल्या प्रमाणात लोह आणि हेल्दी फॅट्स असतात, जे मासिक पाळीचा फ्लो सुधारण्यासोबतच येणारी सूज कमी करण्यास मदत होते.

सीड्स : आहारात अळशी, भोपळा आणि चिया या चांगल्या प्रमाणात हेल्दी फॅट्स आणि इतर अनेक पोषक तत्वे भरपूर प्रमाणात असलेल्या बियांचा आहारात समावेश करावा.

धान्य : ब्राऊन राईस, ओट्स आणि गहू यांसारख्या पोषक तत्वांनी युक्त धान्यांचा आहारात समावेश करावा.

# रायगडच्या विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करणार -पालकमंत्री गोगावले





**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती केल्याबद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह संपूर्ण महायुती सरकारचे मनापासून आभार मानतो. आतापर्यंत मंत्री म्हणून कर्तव्य पार पाडत होतो, परंतु आता रायगड जिल्ह्याच्या जनतेसाठी अधिक जबाबदारीने काम करून पालकमंत्रीपदाला न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार, अशा शब्दांत रोजगार हमीमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे नवनियुक्त पालकमंत्री भरत गोगावले यांनी भावना व्यक्त केल्या.

रायगड ही माझी मायभूमी आणि कर्मभूमी आहे. या जिल्ह्याच्या मातीत वाढलो. इथल्या जनतेने प्रेम, विश्वास दिला आणि लोकप्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी दिली. आज महाड-माणगाव-पोलादपूर मतदारसंघाचा प्रतिनिधी म्हणून काम करत असताना संपूर्ण रायगड जिल्ह्याची पालकमंत्री म्हणून सेवा करण्याची जबाबदारी मिळाली आहे. ही माझ्यासाठी अभिमानाची आणि तितकीच मोठी जबाबदारी आहे, असे गोगावले म्हणाले. छत्रपती शिवरायांच्या पुण्य व पवित्र भूमीचा भूमिपुत्र आणि शिवरायांचा मावळा म्हणून रायगडच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय समोर ठेवून काम करणार आहे. रायगडच्या प्रत्येक तालुक्याचा, प्रत्येक गावाचा आणि प्रत्येक नागरिकाचा विकास झाला पाहिजे, यासाठी सर्वांना सोबत घेऊन प्रामाणिकपणे काम करीन.

आजपर्यंत महाड-माणगाव-पोलादपूर मतदारसंघातील जनतेने आणि पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिलेल्या शिवसैनिकांनी जी साथ दिली त्याबद्दल आभारी आहे. आता हीच साथ आणि आशीर्वाद संपूर्ण रायगडच्या विकासासाठी घेऊन पुढे जायचे आहे. माझ्यासाठी पालकमंत्रीपद केवळ पद नाही, तर जनतेची सेवा करण्याची मोठी संधी आणि जबाबदारी आहे. रायगडच्या विकासाची संधी मला मिळाली आहे. या संधीचे नक्कीच सोने करीन, असे गोगावले यांनी सांगितले.

## आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त जिल्हास्तरीय रॅली उत्साहात



**रायगड-अलिबाग : जिमाका**

आयुक्त (शहरी आरोग्य) तथा प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, वडाळा, मुंबई डॉ.सुनील भोकरे व जिल्हाधिकारी, रायगड तथा अध्यक्ष जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कमिटी रायगड-अलिबाग किशन जावळे यांच्या मार्गदर्शनानुसार तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील व उपसंचालक (आयईसी) तथा पालक अधिकारी (डापकु रायगड), महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, वडाळा, मुंबई रोशनी कदम यांच्या नियोजनानुसार जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग संजय माने यांच्यामार्फत आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथे जिल्हास्तरीय रॅली कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या रॅलीच्या सुरुवातीस शपथ घेऊन रॅलीस जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरुवात जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथून निघून महावीर चौकातून शिवाजी पुतळ्या जवळून बालाजी नाका मार्गे पुन्हा जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथे समाप्त करण्यात आली.

या रॅलीमध्ये नर्सिंग स्कूल, जिल्हा सामान्य रुग्णालय, जनता शिक्षण मंडळ, महाविद्यालय अलिबाग, प्रभाकर नारायण पाटील कॉलेज वेश्वी येथील विद्यार्थी विद्यार्थिनींनी भाग घेऊन सदरची स्पर्धा यशस्वीपणे पार पडली. तसेच हातात फलक घेऊन अडथळ्यांवर मात करू, एकजुटीने एचआयव्ही/एड्सला लढा देऊ, नवं परिवर्तन घडवू, वचन पाळा, एड्स टाळा, स्त्री शक्तीचा एकच नारा एचआयव्ही/एड्स हद्दपार करा, होऊया एकसंघ करूया एचआयव्हीचा प्रतिबंध इत्यादी विविध घोषवाक्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

रॅलीकरिता उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना ॲड. निहा राऊत यांनी पाणी व अल्पोपहार देऊन सहकार्य केले. अध्यक्ष नितीन पाटील, लायन्स ॲड. कला पाटील, राधिका पाटील, तानाजी भोसले, विद्याधर पैठणकर, वैशाली कुचेकर, रोहिणी पाठक या कार्यक्रमाकरिता पोलीस निरीक्षक कार्यालय यांच्याकडून पोलीस बंदोबस्त करून उत्तम सहकार्य केले.

ही रॅली सुरळीत पार पाडण्याकरिता जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय अलिबाग येथील जिल्हा सहाय्यक लेखा रवींद्र कदम, जिल्हा सहाय्यक एम अँड ई सौ. रश्मी सुंकले, जिल्हा सहाय्यक कार्यक्रम श्री. संपदा मळेकर डापकु, आयसीटीसी प्रयोगशाळा तंत्रज्ञ सुजाता तुळपुळे, अमित सोनावणे, समुपदेशक, कल्पना गाडे, अर्चना जाधव, डीएसआरसी समुपदेशक अश्विनी कदम, मोबाईल आयसीटीसी व्हॅन समुपदेशक रामेश्वर मुळे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ गणेश सुतार, वाहनचालक अतिश नाईक, क्लिनर श्री. रुपेश पाटील, रक्तपेढी समुपदेशक मनोहर हाडस, वाहनचालक महेश घाडगे, क्लिनर मंगेश पिंगळा, एआरटी वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप रैसवाल, समुपदेशक अक्षय बेरड, डाटा मॅनेजर कोमल लोखंडे, स्टाफ नर्स सानिका तुणतुणे यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाच्या वेळी जिल्हा सामान्य रुग्णालयातील नर्सिंग ऑफिसर तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयातील कार्यालयांमधील व ओपीडीमधील सर्व अधिकारी व कर्मचारी हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे स्वागत, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने यांनी केले.

## रोह्यात मोकाट गुरांचा प्रश्न ऐरणीवर; कोंडवाड्याची मागणी

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात मोकाट गुरे बसत असल्याने मोकाट गुरांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रोहा तालुक्यातील मुंबई-गोवा महामार्गावर मोकाट गुरांचा प्रश्न आधीपासून होता. आता ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात मोकाट गुरे सर्वत्र दिसून येत आहेत.

रोहा-कोलाड रोड, भुवनेश्वर परिसर, रोहा-चणेरे रोड तसेच रोहा शहरातील वर्दळीच्या ठिकाणी रस्त्यावर गुरे बसत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. दिवसा ही गुरे दिसून येतात, परंतु रात्री मोठ्या प्रमाणात घोळक्याने ही गुरे रस्त्यावर बसल्याचे दिसून येते. रात्री कामगारवर्ग आणि कामानिमित्ताने बाहेर गेलेल्या प्रवाशांना रस्त्यावर बसलेली ही गुरे उठवताना नाकीनऊ येत आहेत. शेतीची कामे संपल्यामुळे काही प्रमाणात ही गुरे आता मोकळी सुटलेली आहेत.

पूर्वी या मोकाट गुरांसाठी कोंडवाडा असायचा, परंतु रोहा शहरासह ग्रामीण भागातील कोंडवाडे नाहीसे झाल्याने या गुरांना कुठे ठेवायचे, हा प्रश्न आता सतावत आहे. रात्री मोकाट गुरे बिनधास्त फिरत असतात. यामध्ये प्रामुख्याने गाय, वासरू, बैल यांचा समावेश आहे. दुभती जनावरे वगळता इतर जनावरे मोठ्या प्रमाणात आहेत. रात्री रस्त्यावर दिसून न आल्याने अपघात होण्याची शक्यता अधिक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

मोकाट गुरे सोसायट्यांमध्ये घुसल्याने शेणाचा सडा पडत आहे. पावसामुळे गुरे सोसायट्यांमधील पार्किंगच्या जागेत आसरा घेत असल्याचे दिसून येते. या मोकाट गुरांचा बंदोबस्त करून त्यांच्यासाठी कोंडवाड्याची व्यवस्था करण्याची मागणी होत आहे.

## विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून दंड वसूल; मध्य रेल्वेची मोहीम तीव्र

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने सुरक्षित, सुलभ आणि सन्मानजनक प्रवासाची खात्री करण्याच्या कटिबद्धतेनुसार आपल्या संपूर्ण नेटवर्कवर अनधिकृत आणि विनातिकीट प्रवासाविरुद्धची कारवाई अधिक तीव्र केली आहे. एप्रिल ते जुलै २०२६ या कालावधीत मध्य रेल्वेच्या विशेष तिकीट तपासणी पथकांनी विनातिकीट किंवा अयोग्य/अवैध प्रवास प्राधिकरणासह प्रवास करणाऱ्या १५.४६ लाख प्रवाशांना पकडले आणि त्यांच्याकडून १२१.३१ कोटी रुपयांचा विक्रमी दंड वसूल केला आहे.

गेल्या वर्षी याच कालावधीत १४.४२ लाख प्रकरणे आणि ८६.७३ कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आला होता. त्या तुलनेत प्रकरणांच्या संख्येत ७%पेक्षा जास्त आणि महसुलात जवळपास ४० टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येते.

दरम्यान, गैरसोय आणि दंड टाळण्यासाठी योग्य तसेच वैध तिकीट काढून सन्मानाने आणि जबाबदारीने आपला प्रवास पूर्ण करावा, असे आवाहन मध्य रेल्वेने सर्व प्रवाशांना केले आहे.


### रोहा अष्टमी नगर परिषद

**ता-रोहा, जिल्हा-रायगड पिन कोड - ४०२१०९**

फोनः- कार्यालय-०२१९४ २३५५२०, फॅक्सः ०२१९४-२३४०८७

Email: rohanagarpalika@gmail.com,

क्र. रोनप/जाहीर सूचना/१४२४/२०२६-२७ दिनांक- १९/०८/२०२६

**निविदा सूचना**

रोहा अष्टमी नगर परिषद, रोहा नगर परिषद यांस कडून अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून रोहा अष्टमी नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकरिता वेहीकल माऊन्टेड जेट कम सक्शन मशिन भाडेतत्वावर पुरवठा करणे व लाईन चोकअप काढून वाहिन्या कार्यान्वित करून देणे कामाची निविदा दरपत्रक मागविणेत येत आहे. सदर संपुर्ण निविदा प्रक्रिया ऑफलाईन पध्दतीने होईल. निविदा नोटीस, प्रसिध्दी, सुचना, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुध्दीपत्रक इत्यादी माहीती नगर परिषद कार्यालयातील पाणीपुरवठा विभागात दिनांक २०-०८-२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजले पासून ०१-०९-२०२६ पर्यंत दुपारी ४.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल.

**सही/-**
**(अजयकुमार एडके)**
**मुख्याधिकारी**
**रोहा अष्टमी नगर परिषद**

**सही/-**
**(कु. वनश्री अवनी समीर शेडगे)**
**नगराध्यक्षा**
**रोहा अष्टमी नगर परिषद**



### रोहा अष्टमी नगर परिषद

**ता-रोहा, जिल्हा-रायगड पिन कोड - ४०२१०९**

फोनः- कार्यालय-०२१९४ २३५५२०, फॅक्सः ०२१९४-२३४०८७

Email: rohanagarpalika@gmail.com,

क्र. रोनप/जाहीर सूचना/१४२१/२०२६-२७ दिनांक- १९/०८/२०२६

**जाहीर निविदा/ कोटेशन सूचना**

रोहा अष्टमी नगरपरिषद कार्यक्षेत्रात हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान अंतर्गत विविध कामे करणे करिता नगर परिषदेद्वारे खालील कामासाठी अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून विहित नमुन्यात निविदा दरपत्रक/ कोटेशन मागविण्यात येत आहे. विहीत नमुन्यातील सर्व अटी शर्तीसह निविदा दरपत्रक / कोटेशन नगर परिषद कार्यालय, रोहा येथे कार्यालयीन वेळेत दिनांक-२०/०८/२०२६ पासून दिनांक- २७/०८/२०२६ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत दुपारी २.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी सादर करण्यात येतील. निविदा फॉर्म, आवश्यक कागदपत्राचा तपशील, पुरवठा करावयाचे साहित्य/ वस्तु व इतर कामाबाबत अधिक माहितीसाठी नगर परिषदेच्या संबंधित विभागात संपर्क साधावा.

| क्र. | कामाचा तपशिल | विभाग |
|---|---|---|
| १. | रोहा अष्टमी नगर परिषदेच्या शाळेमध्ये प्रयोगशाळा (Laboratory Instruments) येथे साहित्य पुरविणे. | शिक्षण विभाग |
| २. | रोहा अष्टमी नगर परिषदेच्या शाळेमध्ये मार्शलआर्ट शिक्षक नेमणूक करणे. | शिक्षण विभाग |
| ३. | रोहा अष्टमी नगर परिषदेच्या शाळेमध्ये संस्कृत पुस्तक पुररवठासह शिक्षक नेमणूक करणे. | शिक्षण विभाग |
| ४. | रोहा अष्टमी नगर परिषदेच्या शाळांकरिता क्रीडा साहित्य पुरवठा करणे. | शिक्षण विभाग |
| ५. | रोहा अष्टमी नगर परिषदेच्या शाळेमध्ये वाचन संस्कृतीला चालना देणेच्या उद्देशाने सकाळ NIE शैक्षणिक उपक्रम अंतर्गत साप्ताहिक वर्तमान पत्र मागविणे. | शिक्षण विभाग |
| ६. | रोहा अष्टमी नगर परिषदेस भौतिकोपचार (Physiotherapy) करिता साहित्य पुरवठा करणे. | आरोग्य/स्वच्छता |
| ७. | रोहा अष्टमी नगर परिषदेस लसीकरण मोहीम व आरोग्य शिबिर अंतर्गत महिलांकरिता HPV लसीकरण करणे कामी लस पुरवठा करणे. | आरोग्य/स्वच्छता |
| ८. | रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीमध्ये नगर परिषदेच्या भूखंडावर मियावाकी उद्यान विकसित करणे. | आरोग्य/स्वच्छता |

**सही/-**
**(अजयकुमार एडके)**
**मुख्याधिकारी**
**रोहा अष्टमी नगर परिषद**

**सही/-**
**(कु. वनश्री अवनी समीर शेडगे)**
**नगराध्यक्षा**
**रोहा अष्टमी नगर परिषद**



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, खाली तक्यात नमुद केलेली शेतजमिन मिळकतीचे क्षेत्रापैकी काही क्षेत्र माझे अशिलांनी सदर क्षेत्राचे मालक झरना सम्कित राख्यान यांचेकडून कायम स्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे. माझे अशिल विकत घेत असलेल्या क्षेत्राचे वर्णन खालीलप्रमाणे.....

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- पाली बुद्रुक, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट नं. व उपविभाग | क्षेत्र हे. आर. चौ. मी. |
|---|---|
| १४७/१/अ | ५-१३-४० पैकी ०-७७-०० एवढे क्षेत्र |
| १४७/२ | ११-६५-३० पैकी २-४२-०० एवढे क्षेत्र |

याप्रमाणे वर नमुद मिळकत माझे अशिलांनी कायम स्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी वर नमुद मिळकतीबाबत झालेल्या व्यवहारांस व मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाही व्यक्तीची/संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तकार, दंग, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान बक्षिस, फरोक्त, साठेकरार, भाडेकरार, वारसा हक्क, पोटगी, लिज, सबलिज, लिएन, सदर मिळकतीतुन जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी अगर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी आपली हरकत लेखी स्वरुपात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा खरेदी विक्री करार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे वर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल :** **सही/-**
**दिनांक :- २०/०८/२०२६** **ॲड. ज्ञानेश्वर श्रीनिवास कुलकर्णी**

कार्यालयीन पत्ता :- गाळा नं. १२५, पहिला मजला, महानगरपालिका शॉपींग कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाचे जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, मोबाईल नं. ८०९७३९९३३१, ई मेल आय.डी. dsk840@gmail.com



### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **धर्मा बाळकृष्ण म्हात्रे व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन-: **मौजे- पिरकोन (५५३३३९)**
**(PU-ID: 18611261082), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १६०/२/अ<br>खाते क्रमांक : १४४४ | १ | ०.२०.८०<br>पो.ख. ०.०२.००<br>एकूण - **०-२२-८०** | २.०० |
| एकुण क्षेत्र ०.२२.८० गुंठयाचे खरेदीखत | | | |

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून **१४ दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यास आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेला कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक राहणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक - २०/०८/२०२६ **सही/-**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी-१०४ सफायर सी.एच.एस.ली. भूखंड क्रमांक ३३/३४
सेक्टर २२ कामोठे ता. पनवेल जि. रायगड - ४१०२०६
मो.क्र- : ९९२०४ ७५८०१



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

**Changu Kana Thakur Arts, Commerce and Science College, New Panvel**
**(Empowered Autonomous)**
**Plot No.1, Sector-11, Khanda Colony, New Panvel (West), Tal.Panvel, Dist.-Raigad – 410206**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING CLOCK HOUR BASIS POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2026-27**

**AIDED**

| Sr. No. | Cadre | Subjects | Total No. of CHB Posts | Category |
|---|---|---|---|---|
| 1 | Assistant Professor | History | 01 | 01 - OPEN |
| 2 | Assistant Professor | Chemistry | 01 | 01 - OPEN |
| 3 | Assistant Professor | Zoology | 02 | 02 - OPEN |
| 4 | Assistant Professor | Microbiology | 05 | 05 - OPEN |
| 5 | Assistant Professor | Political Science | 01 | 01 - OPEN |
| 6 | Assistant Professor | Botany | 02 | 02 - OPEN |
| 7 | Assistant Professor | Commerce | 02 | 02 - OPEN |

The above posts are open to all, however candidates from any category can apply for the post.

Candidate having knowledge of Marathi will be preferred.

"Qualification, Pay Scales and other requirements are as prescribed by the UGC Notification dated 18th July, 2018. Government of Maharashtra Resolution No. Misc-2018./C.R.56/18/UNI-1 dated 8th March 2019 and University Circular No. TASS/(CT)/ ICD 2018-19/1241, dated 26th March, 2019, Higher and Technical Department Government Resolution No. **अर्थसं/२०२२/प्र.क्र.१०५/(१)/मशी-३, दिनांक २७ मार्च २०२३**,University Circular No. **सिटीएयू/०१/२०२४-२०२५, दिनांक २४/०४/२०२४** and Higher and Technical Department Government Resolution No. **संकीर्ण/२०२१/प्र.क्र.१८१/२१/विशी-१, दिनाक १७ आक्टोबर, २०२२**,University Circular No. **सिटीएयू/०३/२०२४-२०२५ दिनांक २६/०४/२०२४** for filling the post on clock hour basis, revised from time to time. The Government resolution & Circular are available on the website mu.ac.in

Application with full details should reach the **Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel, C/o. Changu Kana Thakur Arts, Commerce and Science College, New Panvel (Empowered Autonomous), Plot No.1,Sector-11, Khanda Colony, New Panvel (W), Tal.-Panvel, Dist.-Raigad, Pin-410206** within 15 days from the date of publication of this advertisement.
**This is University approved advertisement.**
If required Contact : **Shri.Pralhad Thakur (9022600288)**

**Hon. Shri. Ramsheth Thakur** (Ex.M.P.)
Chairman, J.B.S.P. Sanstha, Panvel

# मोरबे धरणाचा पाणीसाठा ९२ टक्क्यांवर

## नवी मुंबईकरांना दिलासा



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मोरबेच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या काही आठवड्यांपासून झालेल्या पावसामुळे धरणातील साठा ९२ टक्क्यांवर पोहोचला आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला मोरबे धरणातील घटलेल्या पाणीसाठ्यामुळे नवी मुंबईसमोर निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या संकटातून यामुळे दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत.

मोरबे धरणाची पाणीपातळी मंगळवारी सकाळी ८.३० वाजता ८६.४५ मीटर, तर पाणीसाठा ९२.२३ टक्के नोंदविण्यात आला. धरण परिसरात सोमवारी सकाळी ८ ते मंगळवारी सकाळी ८ या २४ तासांत २२.२ मिलिमीटर पाऊस झाला असून १ जूनपासून आतापर्यंत ३,००४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. नवी मुंबईतही सरासरी २०.३७ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

ऐरोलीत ३०.६, कोपरखैरणेत ३०, दिघ्यात २९.२, वाशीत ११.४, नेरुळमध्ये ११ आणि बेलापूरमध्ये १०.०४ मिलिमीटर पाऊस झाला. १ जूनपासून शहरात आतापर्यंत २,२६०.६० मिलिमीटर पाऊस झाला आहे. मोरबे धरणातील पाणीसाठा मे महिन्याच्या अखेरीस झपाट्याने कमी झाल्याने महापालिकेला पाणीपुरवठ्याबाबत कठोर उपाययोजना कराव्या लागल्या होत्या. २५ मेपासून १० टक्के पाणी कपात लागू करण्यात आली होती. तसेच जलतरण तलाव बंद करणे आणि दुपारचा पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

वाढती लोकसंख्या, नवीन बांधकामे आणि विविध प्रकल्पांमुळे पाण्याची मागणी वाढत असताना धरणातील घटत्या साठ्यामुळे प्रशासनाची चिंता वाढली होती.

### नियोजन आवश्यक

मोरबे धरणातील साठा ९२ टक्क्यांवर पोहोचल्याने नवी मुंबईच्या पाणीपुरवठ्याला मोठा आधार मिळाला आहे. त्यामुळे पाणीटंचाईची चिंता काही प्रमाणात कमी झाली असली तरी शहराची वाढती पाण्याची गरज लक्षात घेता पाणी बचत आणि दीर्घकालीन पाणी नियोजनाचे आव्हान कायम राहणार आहे.

# कोपरखैरणेत पोलीस असल्याचे भासवून ज्येष्ठाची फसवणूक

**नवी मुंबई : बातमीदार**

नकली पोलीस असल्याचे भासवून एका ६३ वर्षीय ज्येष्ठ महिलेचे तब्बल तीन लाख ८५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हातचालाखीने लांबवल्याची धक्कादायक घटना कोपरखैरणे येथे घडली आहे. याप्रकरणी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात दोन अनोळखी भामट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार आझाद चंद्रेश बोलिया (६३, रा. मारुती पार्क, सेक्टर १२ बी, बोनकोडे, कोपरखैरणे) या आपल्या पतीसोबत भाजीपाला घेऊन घरी परतत होत्या. १७ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजेच्या सुमारास सेक्टर १२ मधील कलश उद्यान, बालाजी गार्डनजवळ मोटारसायकलवरून आलेल्या सुमारे ४० वर्षे वयाच्या दोन अनोळखी इसमांनी त्यांना गाठले. दोघांनी निळ्या रंगाचे रेनकोट आणि डोक्यात हेल्मेट परिधान केले होते.

आपण पोलीस असल्याचे सांगत या भामट्यांनी फिर्यादी व त्यांच्या पतीला विश्वासात घेतले. सुरक्षेचे कारण सांगून त्यांनी फिर्यादीच्या अंगावरील सोन्याचे दागिने काढायला लावले आणि ते कागदात बांधून देण्याचे नाटक केले. त्यानंतर भामट्यांनी हातचालाखी करून मूळ सोन्याचे दागिने स्वतःकडे ठेवून घेत फिर्यादीला खोटे सोने असलेली पुडी हातात सोपवली आणि तेथून पळ काढला.

घटनेनंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादीने पोलिसांत धाव घेतली. याप्रकरणी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोपरखैरणे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील बोडके पुढील तपास करत आहेत.

# वशेणीतील गुणवंतांचा २३ ऑगस्टला सन्मान

## इतिहास संपादकीय मंडळातर्फे जनसेवा पुरस्कार

**उरण : प्रतिनिधी**

जनसेवेतून आनंद देणाऱ्या आणि शिक्षणासह विविध सामाजिक क्षेत्रांतील व्यक्तिमत्त्वांच्या गुणवत्तेसाठी कटिबद्ध असलेल्या उरण तालुक्यातील वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचा आठवा वर्धापन दिन २३ ऑगस्ट रोजी संपन्न होणार आहे. या निमित्ताने शिक्षण क्षेत्रासह विविध सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या वशेणी गावातील व्यक्तिमत्त्वांना जनसेवा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे, अशी माहिती वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचे कार्यवाह मच्छिंद्र म्हात्रे यांनी दिली.

गेली सात वर्षे विविध क्षेत्रात कार्य करून वशेणी गावाचे नाव उंचावणाऱ्या गुणवंत व्यक्तिमत्त्वांचा शोध घेऊन अशा व्यक्तिमत्त्वांना वशेणी इतिहास संपादकीय मंडळातर्फे जनसेवा पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या मानाच्या व प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या जनसेवा पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ व भेटवस्तू असे आहे, अशी माहिती मंडळाच्या कार्यकर्त्यांनी दिली.

कार्यक्रम रायगड जिपच्या प्राथमिक शाळेतील स्व. जगन्नाथ मरू म्हात्रे सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

# नवी मुंबईत आरोग्यसेवेचा विस्तार : ऐरोली रुग्णालयाचा दर्जा वाढविण्यावर भर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वाढती लोकसंख्या आणि महापालिकेच्या आरोग्य सुविधांवर वाढणारा ताण लक्षात घेऊन महानगरपालिकेने 'एकात्मिक आरोग्य सुविधा व व्यवस्थापन धोरण २०२६'चा आराखडा तयार केला आहे. हा प्रस्ताव सभागृह नेते सागर नाईक यांच्यामार्फत आगामी महासभेत मंजुरीसाठी मांडण्यात येणार आहे. नवी मुंबईतील आरोग्य सेवेत आमूलाग्र बदल करण्यासाठी हा प्रस्ताव महत्त्वाचा मानला जात आहे.

'एकात्मिक' धोरणांतर्गत सध्याच्या १९ आरोग्यवर्धिनी केंद्रांची संख्या ५९ करण्याबरोबरच वैद्यकीय मनुष्यबळ वाढविणे, वाशी आणि ऐरोली रुग्णालयांतील उपचार व निदान सुविधा विस्तारणे आणि औषध व्यवस्थापन अधिक केंद्रीकृत करण्याचा प्रस्ताव आहे. शहरातील आरोग्य सेवेचे विकेंद्रीकरण करताना प्राथमिक उपचार नागरिकांच्या घराजवळ उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. आरोग्य सेवेच्या विस्तारासाठी १५ व्या वित्त आयोगाचा निधी आणि राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानांतर्गत ५६ एमबीबीएस डॉक्टरांची कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती प्रस्तावित आहे.

त्यासोबत नऊ महिला परिचारिका, दोन पुरुष परिचारिका, १७ एएनएम, ११ प्रयोगशाळा तंत्रज्ञ, दोन औषधनिर्माते, एक सार्वजनिक आरोग्य व्यवस्थापक आणि एक साथरोगतज्ज्ञ अशा ४३ कर्मचाऱ्यांची भरती केली जाणार आहे. मात्र, आरोग्य व्यवस्थेचा विस्तार कंत्राटी मनुष्यबळावर करताना डॉक्टरांची उपलब्धता आणि सेवांचे सातत्य राखणे प्रशासनासाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

या धोरणातून आरोग्य केंद्रांपासून मोठ्या रुग्णालयांपर्यंतची सेवा एकमेकांशी जोडण्याचा प्रयत्न आहे. मात्र, नव्या सुविधा उभारण्याबरोबर त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, उपकरणांची देखभाल, औषधांचा नियमित पुरवठा आणि बाह्य संस्थांच्या सेवांवर नियंत्रण या बाबींची प्रभावी अंमलबजावणी झाल्यासच या आराखड्याचा नागरिकांना प्रत्यक्ष लाभ मिळणार आहे. त्यामुळे येत्या महासभेत या धोरणावर कशा प्रकारे चर्चा होते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांबरोबरच महापालिका रुग्णालयांतील उपचारांची पुढील पायरीही बळकट करण्याचा प्रयत्न या धोरणातून करण्यात आला आहे. ऐरोली येथील माता-बाल रुग्णालयाचा दर्जा वाढवून त्याचे १०० खाटांच्या सर्वसाधारण रुग्णालयात रूपांतर करण्याचा प्रस्ताव आहे.

रुग्णालय पूर्ण क्षमतेने चालविण्यासाठी बाह्य संस्थेमार्फत मनुष्यबळ व वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करून देण्याचा प्रायोगिक विचार आहे.



### वाशी रुग्णालयात सुविधांचा विस्तार

वाशी रुग्णालयातही अतिदक्षता व प्रगत निदान सुविधांचा विस्तार प्रस्तावित आहे. नवजात बालकांसाठी एनआयसीयू, आयसीयू तसेच बालरुग्णांसाठी पीआयसीयू सुविधा वाढविण्याबरोबरच एमआरआय, सीटी स्कॅन, मॅमोग्राफी, सोनोग्राफी व अन्य निदान सेवा एकाच व्यवस्थेत उपलब्ध करण्याचा विचार आहे. त्यामुळे गंभीर रुग्णांना अन्यत्र जाण्याची गरज कमी होणार आहे.

### केंद्रीय औषध भांडार

औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याने उपचार खोळंबू नयेत यासाठी केंद्रीय औषध भांडार उभारण्याचा प्रस्ताव आहे. खरेदी, साठवण आणि वितरणाची प्रक्रिया केंद्रीकृत केल्यास औषधांचा नियमित पुरवठा राखण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर अचानक गरज भासल्यास स्थानिक पातळीवर तातडीची औषध खरेदी करता यावी यासाठी मर्यादित आर्थिक अधिकार देण्याचीही तरतूद आहे.

# रयत सेवक कॉपरेटिव्ह बँकेचा वर्धापन दिन उत्साहात; पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत सेवकांची अर्थवाहिनी ठरलेल्या दि रयत सेवक कॉपरेटिव्ह बँकेचा वर्धापन दिन १६ ऑगस्ट रोजी वाशी शाखेत रायगड विभागाच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी बँकेची वाटचाल, रयत सेवकांच्या आर्थिक स्थैर्यातील योगदान तसेच सभासदांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध आर्थिक सुविधांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

वाशी, नवी मुंबई येथील बँकेच्या शाखेत आयोजित वर्धापन दिन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय अधिकारी मोहनराव कोंगेरे होते. प्रमुख अतिथी म्हणून सहाय्यक विभागीय अधिकारी विलासराव जगताप, संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक, माजी संचालक तथा लाइफ मेंबर लालासाहेब खलाटे, प्रमोद कोळी, माजी संचालक नूरा शेख, सभासद प्रतिनिधी नितीन ठाकूर, विलास गांगड, शाखा व्यवस्थापक प्रदीप माने यांच्यासह माजी मुख्याध्यापक मधुकर हरणे, अरुण घाग, माजी उपाध्यापक सागर रंधवे, उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक अविनाश घरत, ज्युनिअर कॉलेज शिक्षक भिकाजी गाढे, बाबूराव पाटोळे, राजू खेडकर तसेच रोशन पाटील, गोविंद म्हात्रे, शाखा कर्मचारी राजू पठाण, प्रेरणा म्हात्रे, किरण नलावडे, सागर खरात यांच्यासह बँकेचे सभासद, रयत सेवक, सेवकांचे पाल्य व विद्यार्थी उपस्थित होते.



बँकेचे विद्यमान संचालक तथा वाशी शाखेचे चेअरमन किशोर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. यावेळी अध्यक्षीय भाषणात विभागीय अधिकारी मोहनराव कोंगेरे यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या दूरदृष्टीतून स्थापन झालेल्या रयत सेवक कॉपरेटिव्ह बँकेचे महत्त्व विशद केले. रयत सेवकांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याबरोबरच त्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी बँकेची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले.

सहाय्यक विभागीय अधिकारी विलासराव जगताप यांनी रयत सेवकांना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यात बँकेचे योगदान अधोरेखित केले. सभासदांच्या आर्थिक हितासाठी बँकेने केलेली वाटचाल कौतुकास्पद असल्याचे सांगत त्यांनी वर्धापन दिनानिमित्त सर्व सभासदांना शुभेच्छा दिल्या. यावेळी बँकेचे माजी संचालक तथा रयत शिक्षण संस्थेचे लाइफ मेंबर लालासाहेब खलाटे, प्रमोद कोळी तसेच माजी संचालक नूरा शेख यांनी समयोचित मनोगत व्यक्त करून रयत सेवकांच्या जीवनातील रयत बँकेचे महत्त्व अधोरेखित केले.

दरम्यान, रयत शिक्षण संस्थेच्या ज्यूचंद्र येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयास आयएसओ मानांकन प्राप्त झाल्याबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा सहाय्यक विभागीय अधिकारी विलासराव जगताप यांचा वाशी शाखेच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. विद्यालयाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. रयत को-ऑपरेटिव्ह बँक केवळ सभासदांना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याचे कार्य करत नाही, तर गुणवत्तापूर्ण कार्याचीही कदर करते हे या सत्कारातून अधोरेखित झाले.

नुकतेच संस्थेच्या सेवेतून निवृत्त झालेले गव्हाण शाखेतील माजी उपाध्यापक सागर शंकर रंधवे यांचाही दीर्घकाळ केलेल्या सेवाभावी कार्याबद्दल वाशी शाखेच्या वतीने पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन शुभेच्छांसह सन्मान करण्यात आला. उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या प्रभारी मुख्याध्यापकपदी अविनाश घरत यांची नुकतीच बदलीने नियुक्ती झाली असून त्यांचाही यानिमित्त शाखेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सभासद प्रतिनिधी नितीन ठाकूर यांनी केले. प्रास्ताविकामध्ये त्यांनी बँकेच्या स्थापनेपासूनच्या इतिहासाची संक्षिप्त माहिती विशद केली. सागर रंधवे यांनी वर्धापन दिन सोहळ्याचे सूत्रसंचालन केले, तर शाखा व्यवस्थापक प्रदीप माने यांनी उपस्थितांचे आभार मानले. उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या या वर्धापन दिन सोहळ्याची सांगता अल्पोपहार वाटपाने झाली.

# विसरलेली बॅग केली परत; रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

**नवी मुंबई : बातमीदार**

आजच्या धावपळीच्या आणि स्वार्थी होत चाललेल्या जगात माणुसकी अजूनही जिवंत असल्याचा प्रत्यय मंगळवार दि. १८ रोजी बेलापूर स्थानक परिसरात आला. एकविरा माता रिक्षाचालक-मालक संघटनेचे सभासद व रिक्षाचालक विजय मार्के यांच्या रिक्षात बेलापूर गाव ते बेलापूर रेल्वे स्थानक या प्रवासादरम्यान एका महिला प्रवाशाची बॅग राहून गेली होती. बॅग आढळल्यानंतर क्षणाचाही विलंब न करता ती सुरक्षित ठेवून संबंधित महिला प्रवाशाच्या स्वाधीन करण्यात आली.

रिक्षात बॅग सापडली तेव्हा त्यामध्ये काय आहे, यापेक्षा 'ही वस्तू आपल्या मालकीची नाही, ती तिच्या खऱ्या मालकापर्यंत पोहोचली पाहिजे' एवढाच साधा आणि माणुसकीचा विचार मनात ठेवण्यात आला. कोणताही मोह न ठेवता प्रामाणिकपणे ती बॅग एकविरा माता रिक्षाचालक-मालक संघटनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर कोळी यांच्या स्वाधीन करण्यात आली. यामुळे बॅग परत करण्याची ही कृती निश्चितच समाजासाठी एक आदर्श ठरली आहे.आपल्या रोजच्या प्रवासात अनेक प्रवाशांच्या वस्तू रिक्षात राहून जाण्याची शक्यता असते.

अशा वेळी त्या वस्तू परत करण्याची जबाबदारी आणि नैतिकता जपणारे हात समाजाचा विश्वास अधिक दृढ करतात. या घटनेतही एका महिला प्रवाशासाठी तिची बॅग केवळ एक वस्तू नव्हती, तर त्यामध्ये तिच्या गरजेच्या आणि भावनिकदृष्ट्या महत्त्वाच्या वस्तू होत्या. ती पुन्हा हात मिळाल्याचा आनंद तिच्यासाठी निश्चितच अविस्मरणीय ठरला.दरम्यान, पैशांपेक्षा प्रामाणिकपणा मोठा आणि वस्तूपेक्षा माणुसकी अनमोल असते, हे या घटनेतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. या प्रामाणिक कृतीचे प्रवाशांसह एकविरा माता रिक्षाचालक-मालक संघटना तसेच विविध स्तरांतून कौतुक होत आहे.





# बोंबील झाले स्वस्त! खवय्यांची चंगळ

**उरण : प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या सुरुवातीला मासेमारी बंदी आणि आवक कमी असल्याने बोंबीलचे दर गगनाला भिडले होते. त्यामुळे खवय्यांना एका नगाला १०० रुपये मोजावे लागत होते. मात्र १५ ऑगस्टपासून मासेमारी सुरू झाल्यानंतर बोंबीलची आवक वाढली आहे. तसेच श्रावण महिना सुरू असल्याने मागणी घटली आहे. त्यामुळे खवय्यांना आता एक नग ५ ते १० रुपयांना मिळत आहे.

बोंबील मासा हा पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतो. खास करून या काळात माशांची मागणीही मोठी असते. मात्र हा काळ मासेमारी बंदीचा असल्याने बोंबीलचे दर चढे होते. नगाच्या आकारानुसार ही मासळी १०० रुपयांपर्यंत गेली होती. मात्र सध्या खोल समुद्रातील मासेमारी जोमाने सुरू झाली आहे. त्यामुळे हे मासे मोठ्या प्रमाणात उपलब्ध होऊ लागले आहेत. त्यामुळे आवक वाढली आहे.

दुसरीकडे सध्या श्रावण महिना सुरू असल्याने मागणी घटली आहे. मासळीचा नवा हंगाम १५ ऑगस्टपासून सुरू झाला आहे. त्यामुळे मासळीची आवक वाढली असून यात बोंबील मासे मोठ्या प्रमाणात येऊ लागले आहेत.

# बेलापूर रेल्वेस्थानकात दुहेरी पार्किंगचा विळखा

## तातडीच्या कारवाईची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

शहराच्या दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या बेलापूर रेल्वे स्थानक परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या बेशिस्त दुहेरी वाहन पार्किंगमुळे वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहने उभी केली जात असल्याने वाहतुकीसाठी उपलब्ध असलेला रस्ता अरुंद झाला असून, विशेषतः कार्यालयीन वेळेत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या समस्येकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी प्रवासी आणि रिक्षाचालकांकडून होत आहे.

या स्थानकातून दररोज हजारो प्रवासी ये-जा करतात. स्थानक परिसरातील रस्त्यांवर होणाऱ्या दुहेरी पार्किंगमुळे प्रवाशांसह रिक्षाचालक, दुचाकीस्वार आणि इतर वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रिक्षांना प्रवाशांना घेण्यासाठी किंवा सोडण्यासाठी स्थानक परिसरात येताना वाहतूक कोंडीत अडकावे लागत असल्याने प्रवाशांना वेळेत इच्छित स्थळी पोहोचवणेही आव्हानात्मक बनले आहे.



दुहेरी व अनधिकृत पार्किंग रोखावे, नियमित वाहतूक पोलिसांची नियुक्ती करावी. कार्यालयीन वेळेत वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे. बेलापूर स्थानक परिसरात विविध बँका, प्रशासकीय कार्यालये व इतर आस्थापना आहेत. कार्यालयीन वेळेत कर्मचारी खासगी वाहने मुख्य रस्त्यालगत किंवा रस्त्याच्या कडेला उभी करत असल्याने दुहेरी पार्किंगची समस्या अधिक तीव्र होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

राम प्रहर

## श्रावणधारा

### निंबर पाणी

पावसाच्या त्या जलधारा
उतरवतात चढलेला पारा
जल भंडारे भरुनी वाहती
पिके डोलवी सुसाट वारा...
वर्षभरातील सण-वारांना
सुरुवात श्रावण महिन्यात
वातावरण होते चैतन्यमय
श्रावण सरी हर्षे बरसतात...
अवनी सजते जणू नववधू
शालू हिरवा परिधान करते
गवत पात्यांवर थेंब सरींचे
सूर्य किरणांत पहा चमकते...
पडला ऊन लगेच नाहीसा
जागा घेतात सरी श्रावण
पडता-पडता त्या नाहीशा
जागा घेती सूर्याची किरणं...
'निंबर-पाण्याचा' खेळ हा
उल्हासित करतसे तनमन
कधी ऊन-सरी एकत्र येता
नभात दिसे इंद्रधनु कमान...!!



-अरुण द. म्हात्रे,
जासई, उरण, रायगड.

# सर्वंकष प्राथमिक आरोग्य सेवा प्रशिक्षणाचा जिल्ह्यात शुभारंभ

**अलिबाग : प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर व प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने सर्वंकष प्राथमिक आरोग्य सेवा अभियान राज्यभर राबवविण्यात येत आहे. या अंतर्गत रायगड जिल्ह्यात एकूण ७२ प्रशिक्षण सत्र घेण्यात येणार आहेत. कार्यक्रमाचा शुभारंभ जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग तालुक्यातून करण्यात आला.




ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य सेवेचे सक्षमीकरण करणे आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे कौशल्य व कार्यक्षमता उंचावणे हा या प्रशिक्षणाचा मुख्य हेतू आहे. आयुष्मान आरोग्य मंदिर, उपकेंद्रातील समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक आणि आशा कार्यकर्त्यांच्या माध्यमातून ही सेवा थेट ग्रामस्थांपर्यंत पोहचवली जाते. गावात माता व बालमृत्यू दर शून्य ठेवणे, टी.बी., उच्च रक्तदाब, मधुमेह आणि कर्करोग यांचे वेळेत स्क्रिनिंग करणे आणि गृहभेटी, आरोग्य सत्रे आयोजित करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष तथा आरोग्य सभापती मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सूर्यवंशी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयेश गोसावी, माता बाल संगोपन अधिकारी डॉ. दामोदर मोरे, जिल्हा प्रशिक्षण केंद्र वैद्यकीय अधिकारी डॉ. मिलिंद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण ७२ प्रशिक्षण सत्रे घेण्यात येणार आहेत. प्रशिक्षणात १३ मूलभूत घटकांवर मार्गदर्शन करण्यात येईल. यामध्ये गरोदरपण, प्रसूती व प्रसूतीपश्चात काळजी; नवजात व अर्भक आरोग्य सेवा; बालक व किशोरवयीन आरोग्य; कुटुंब नियोजन व प्रजनन आरोग्य; संसर्गजन्य आजारांचे व्यवस्थापन; सामान्य व किरकोळ आजारांवर उपचार; असंसर्गजन्य आजारांचे नियंत्रण; डोळे व कान यांचे प्राथमिक आरोग्य; दातांची स्वच्छता, मुखाच्या कर्करोगाची तपासणी आणि तंबाखूमुक्तीसाठी जनजागृती; वृद्धापकाळ व पॅलिएटिव्ह केअर; आपत्कालीन वैद्यकीय सेवा; मानसिक आरोग्य सेवा आणि योग व आयुष पद्धतीचा समावेश आहे.

## प्रत्येक तालुक्यात प्रशिक्षण सत्र

***या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत अलिबागमध्ये सात सत्रे घेण्यात आली. उरण तालुक्यात चार सत्रे होणार आहेत. पनवेल नऊ, कर्जत आठ, महाड रोहा व माणगाव प्रत्येकी सहा, पेण पाच, खालापूर चार, मुरूड व सुधागड प्रत्येकी तीन, म्हसळा, श्रीवर्धन, पोलादपूर व तळा प्रत्येकी दोन अशी एकूण ७२ प्रशिक्षण सत्रे घेण्यात येणार आहे.***

## पेडली येथे गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**पाली : प्रतिनिधी**

जागृती शिक्षण प्रसारक मंडळ पेडली येथे स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून जनसेवा जनजागृती सामाजिक संस्था खोपोलीच्या संयुक्त विद्यमाने शाळेतील गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना मोफत वह्या आणि शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन जनसेवा जनजागृती सामाजिक संस्थेचे अध्यक्ष व संस्थापक प्रथमेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमास जागृती शिक्षण प्रसारक मंडळाच्या मुख्याध्यापिका मंदा गोळे, संस्थेचे खजिनदार रोहन दळवी, सचिव मोनिका क्षीरसागर, सदस्य रोहित क्षीरसागर, विजय चव्हाण यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत सामाजिक बांधिलकी जपणे हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे मत पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन शिक्षक तांडेल यांनी केले.



# मुरूड येथील जय श्रीराम नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे गुणवंतांचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील दहावी व बारावीत सर्वप्रथम उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा व सदस्यांच्या पाल्यांचा जयश्रीराम पतसंस्थेच्या ३३व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रशस्तीपत्र व रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला.



सभा वसंतराव नाईक महाविद्यालयात झाली. यावेळी चेअरमन दिलीप जोशी व संचालकांच्या हस्ते दीप महेंद्र घाटवळ, तुबा सज्जाद मोझर, वेदांत योगेश केने, इर्तिझा इम्तिहाज गोलंदाज, रूद्राणी हेरंब जोशी, मिताली मनोहर कोतवाल, ॲड. ओम राजन जोशी, ॲड. मोहित मोहन तांबडकर, राहुल मिलिंद जोशी, विहांग विनायक निरकर, आदिती देविदास कुमरोटकर यांना गौरविण्यात आले. प्रास्ताविकात चेअरमन दिलीप जोशी यांनी पतसंस्थेकडे भाग भांडवल चार कोटी तीन लाख रुपये असून ६४ कोटी ४३ लाख ठेवी असल्याचे स्पष्ट करत ७७ लाख ४५ हजार नफा प्राप्त केला असे सांगितले. सलग १२ वर्षे १२ टक्के लाभांशांची परंपरा यावर्षीही कायम राखल्याचे त्यांनी नमूद केले.

व्हाईस चेअरमन प्रा. मेघराज जाधव यांनी पतसंस्थेच्या सदस्यांना हक्क आणि कर्तव्ये या विषयी माहिती देताना सभासदांनी किमान एक हजाराचे तरी भाग खरेदी करावेत तसेच केवायसी प्रकिया पूर्ण करण्याचे आवाहन करून सुधारित आदर्श उपविधीवर मार्गदर्शन केले.

संचालक डॉ. संजय पाटील यांनी तुमच्या नेत्रदानाच्या एका निर्णयामुळे दोन व्यक्तींना पुन्हा दृष्टी मिळू शकते. त्यामुळे सभासदांनी मरणोत्तर नेत्रदान करावे, असे आवाहन उपस्थितांना केले. आगामी वर्षात एकत्रित व्यवसाय ११५ कोटींपर्यंत जाईल, असा विश्वास जोशी यांनी व्यक्त केला.

संस्थेला जिल्हा कार्यक्षेत्राची परवानगी मिळाल्याने बोर्ली–पंचतन व चेंढरे (अलिबाग), तळा, पोयनाड, पाली येथे शाखा विस्ताराचा प्रस्ताव मांडण्यात आला. त्यास एकमताने सर्व सदस्यांनी मंजुरी दिली. सभेच्या प्रारंभी श्रीराम प्रतिमेचे पूजन ज्येष्ठ सदस्य रमेश कवळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ॲड. मोहन तांबडकर, बाळकृष्ण कासार, सुनील विरकुड, डॉ. संजय पाटील, डॉ. अमित बेनकर, प्रमोद उपाध्ये, समीर उपाध्ये, अशोक दिवेकर, जयश्री जोशी, अश्विनी पाटील, सिद्धेश गद्रे, सरव्यवस्थापक संजय ठाकूर आदी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार डॉ. अमित बेनकर यांनी मानले. पसायदाने सभेचा समारोप करण्यात आला.

## विश्वकोश ज्ञानवर्धन स्पर्धेत वडेर हायस्कूलचा डंका



**पाली : प्रतिनिधी**

पाली येथील जी.बी. वडेर हायस्कूल व व.ग. ओसवाल कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विश्वकोश ज्ञानवर्धन राज्यस्तरीय स्पर्धा २०२६मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या या स्पर्धेत राज्य, जिल्हा आणि तालुकास्तरावरील गुणवत्ता यादीत शाळेच्या तब्बल १० विद्यार्थ्यांनी मानाचे स्थान पटकावले.

जिल्हास्तरीय शहरी विभागात भोईर स्वरा व खंडागळे श्रेयस यांनी प्रथम क्रमांक, तर हुले सेजल हिने द्वितीय आणि पिंपळे रुद्र याने तृतीय क्रमांक पटकावला. रायगड ग्रामीण विभागातही शाळेने दमदार कामगिरी केली. फोंडे अर्जुन याने प्रथम, झांजे अविनाश याने द्वितीय, तर पठाण अरमान याने तृतीय क्रमांक मिळविला.

तालुकास्तरीय सुधागड ग्रामीण विभागात केदारी सुयश याने प्रथम, तर पोटे शुभम याने द्वितीय क्रमांक पटकावला. शहरी विभागात चोरघे स्वरूप याने प्रथम क्रमांक मिळवित शाळेच्या यशात आणखी भर घातली.

या उल्लेखनीय यशाबद्दल स्वातंत्र्य दिनानिमित्त अलिबाग येथील पोलीस परेड मैदानावर झालेल्या ध्वजारोहण समारंभात विद्यार्थ्यांचा मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते रोख पारितोषिक व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

या घवघवीत यशाबद्दल सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष गीता पालरेचा यांनी विद्यार्थ्यांचे तसेच मुख्याध्यापक भाऊसाहेब घोडके, मार्गदर्शक शिक्षक विक्रम काटकर, पर्यवेक्षिका संचालिका तृप्ती मराठे, सुधीर शिंदे, सुजित जगताप यांचे अभिनंदन केले.

## सॅम मित्र मंडळ व वीर वीरेश्वर रेस्क्यू टीमचा सत्कार

**पाली : प्रतिनिधी**

६ जुलै रोजी झालेल्या मुसळधार अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीत आपल्या प्राणाची पर्वा न करता देवदूतासारखे धावून आलेले सॅम मित्र मंडळ आणि वीर वीरेश्वर रेस्क्यू टीम यांच्या कार्याची दखल घेण्यात आली आहे. या पथकातील सदस्यांचा स्वातंत्र्यदिनी सुधागड तहसील कार्यालय येथे तहसीलदार उत्तम कुंभार तसेच आपत्ती व्यवस्थापन कार्यालयातर्फे विशेष सत्कार करण्यात आला.

सुधागड तालुक्यात ६ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक सखल भागात पुराचे पाणी साचले होते. कित्येक नागरिक आणि जनावरे पुराच्या पाण्यात अडकून पडली होती. अशा अत्यंत बिकट व धोकादायक परिस्थितीत सॅम मित्र मंडळ आणि वीर वीरेश्वर रेस्क्यू टीमच्या सदस्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जीवाची बाजी लावून त्यांनी केवळ माणसांना सुरक्षित स्थळी हलवले नाही, तर पुराच्या वेढ्यात अडकलेल्या अनेक निष्पाप मुक्या प्राण्यांनाही मृत्यूच्या दाढेतून सुखरूप बाहेर काढले.

या धाडसी आणि सामाजिक बांधीलकी जपणाऱ्या कार्याचे आपत्ती व्यवस्थापन कार्यालयातर्फे आयोजित कार्यक्रमात तहसीलदार उत्तम कुंभार यांनी कौतुक केले.



## कोलाड लायन्स क्लबची कार्यकारिणी जाहीर ; डॉ. श्याम लोखंडे अध्यक्षपदी

**रोहा : प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ कोलाडच्या नवीन टीमचा पदग्रहण सोहळा क्लबचे अध्यक्ष ॲड रवींद्र लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात झाला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नवीन अध्यक्ष म्हणून डॉ. श्याम लोखंडे यांना शपथ देण्यात आली



प्रमुख पाहुणे म्हणून लायन्स क्लब इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३२३१ ए ४चे जिल्हा प्रांतपाल प्रवीण सरनाईक, श्रुती सरनाईक, जिल्हा कॅबिनेट सेक्रेटरी नयन कवळे, प्रमुख पाहुणे रिजन चेअर पर्सन विद्या अधिकारी, झेड चेअर पर्सन मंजुषा कुद्रीमोती, डिस्ट्रिक्ट चेअर पर्सन प्रदीप सिनकर, विवेक सुभेकर, डॉ.मिलिंद पाटील, अनिल अधिकारी, कोलाड लायन्स क्लबचे मुख्य मार्गदर्शक रवींद्र घरत, रोहा लायन्स क्लबचे उपाध्यक्ष जयदेव पवार, संदीप सावंत, नांदगावकर, नागोठणे क्लबचे अध्यक्ष विकास चौलकर, सखाराम ताडकर, माणगाव लायन्स क्लबचे अध्यक्ष संदीप नागे, उलवे आणि कोलाड लायन्स क्लबचे पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

यावेळी उपाध्यक्षपदी डॉ. विनोद गांधी, सचिवपदी अनिल महाडिक, सह सेक्रेटरी भरत महाडिक, खजिनदार दिनकर सानप, तसेच संस्थापक अध्यक्ष डॉ. सागर सानप, नरेश बिरगावले, अलंकार खांडेकर, गजानन बामणे, नंदकुमार कळमकर, राजेंद्रर कोपू, विजय बामुगडे, पूजा लोखंडे, रिया लोखंडे, अमिता बामणे, स्वरा महाडिक, शोभा खांडेकर, विश्वास निकम, दिलीप मोहिते यांना विविध पदांसाठी प्रांतपाल प्रवीण सरनाईक यांनी शपथ दिली.

याच कार्यक्रमात नवे सभासद राजेंद्र धनवी, अनंत मोरे, भिवा पवार, किशोर जाधव,संदीप माने, बिरगावले यांना डिस्ट्रिक कॅबिनेट सेक्रेटरी नयन कवळे यांनी सदस्यत्वाची शपथ देत सेवाभावी लायन्स क्लब संस्थेची माहिती पटवून दिली.

# अशोक लोखंडे विद्यालयातील विद्यार्थ्यांना छत्रीवाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

पिटसई येथील अशोक ल. लोखंडे विद्यालयात इयत्ता पाचवी ते दहावीतील सुमारे ३०० शालेय विद्यार्थ्यांना ओशीन रिना जैन व कुमारी ओशीन फाउंडेशनच्या वतीने ॲड. प्रदीप जैन व परिवार यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना छत्र्याचे वाटप करण्यात आले.

ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांना पावसामध्ये दिलासा मिळावा तसेच शाळेत उपस्थित राहण्याचे प्रमाण वाढावे या उद्दात हेतूने या फाउंडेशनकडून छत्री वाटप करण्यात आले.

प्रास्ताविक सदस्य खेळु वाजे यांनी केले. ॲड. प्रदीप जैन आपल्या मनोगतात म्हणाले की, ३०–४० वर्षांपूर्वी मी ज्या शाळेत शिकत होतो. ती शाळापण अशीच होती. विद्यार्थ्यांनी जर मन लावून अभ्यास केला, तर त्याची निश्चितच प्रगती होते. त्यांनी अभ्यास व खेळ या दोन्ही गोष्टीकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

कार्यक्रमास डॉ. रिना जैन, ॲड. नलिनी मिश्रा, लक्षिता राजोरा, वीरेश छाब्रा, संस्थेचे विश्वस्त महादेव गोळे, अध्यक्ष गणपत जगताप, उपाध्यक्ष मनोहर गायकवाड, सचिव गोविंद ठाकर, ज्येष्ठ सदस्य कृष्णा पंदेरे, सदस्य खेळू वाजे, रमेश पिंपळे, विद्यालयाचे मुख्याध्यापक अकील मुलाणी, ज्येष्ठ शिक्षक सुखदेव सवईसर्जे यांच्यासह विद्यालयातील इतर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या उपक्रमास विद्यालयातील माजी विद्यार्थी रमेश गायकवाड यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील तेलंगे यांनी केले.



# गॉल कसोटीत भारताचा मोठा विजय

## श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेत १-०ने आघाडी

**गॉल : वृत्तसंस्था**

पहिल्या डावात देवदत्त पडिक्कलची शतकी खेळी आणि दुसऱ्या डावात मानव सुथारच्या फिरकीची जादू या दोन युवा खेळाडूंच्या दमदार कामगिरीच्या जोरावर भारतीय संघाने गॉल कसोटीत १६५ धावांनी दिमाखदार विजय नोंदवला. दुसऱ्या सत्रातील श्रीलंकेच्या डावातील ७६व्या षटकात मानवने एकाच षटकात तीन विकेट्स घेत सामन्याचा निकाल जवळपास निश्चित केला.

मानवने सोनल दिनुशा, लसिथ एम्बुलडेनिया आणि प्रभात जयसूर्या यांना माघारी धाडत श्रीलंकेच्या फलंदाजीची कंबर मोडली. त्यानंतर नुवांथाची विकेट घेत त्यानेच श्रीलंकेचा दुसरा डाव २०६ धावांत गुंडाळला आणि भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. ६००व्या ऐतिहासिक कसोटी सामन्यात टीम इंडियाने श्रीलंकेवर मोठा विजय मिळवत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.



पाचव्या आणि अखेरच्या दिवशी श्रीलंकेच्या संघाला २८८ धावा, तर भारतीय संघाला सामना जिंकण्यासाठी सहा विकेट्सची आवश्यकता होती. लंच ब्रेकआधीच रवींद्र जडेजाने सोनल दिनुशा आणि धनंजया डी सिल्वा जोडी फोडली. जड्डूने श्रीलंकन कर्णधाराला तंबूचा रस्ता दाखवला. त्यानंतर प्रसिद्ध कृष्णाने डिकवेला याला स्वस्तात माघारी धाडत टीम इंडियाला विजयाच्या आणखी जवळ नेले.

गॉल कसोटी सामन्यातील पहिल्या डावात भारतीय संघाने देवदत्त पडिक्कलने केलेल्या १६७ धावा आणि केएल राहुल ८२ धावांच्या जोरावर ४६२ धावा करत विजयाचा पाया भक्कम केला होता. या धावसंख्येचा पाठलाग करताना श्रीलंकेकडून सोनल आणि डिकवेला जोडीने झुंज दिली, पण पहिल्या डावात भारतीय संघाला १७२ धावांत मजबूत आघाडी मिळाली.

दुसऱ्या डावात भारतीय संघ २०० धावांच्या आत आटोपला. पंतच्या दमदार अर्धशतकाच्या जोरावर टीम इंडियाने १९३ धावा करत यजमानांसमोर ३७२ धावांचे टार्गेट सेट केले. या धावसंख्येचा पाठलाग करताना सोनम दिनुषाने पुन्हा दमदार खेळी केली, मात्र दुसऱ्या बाजूने त्याला कुणीच साथ दिली नाही. पहिल्या डावातील श्रीलंकेच्या शतकवीराने दुसऱ्या डावात ८४ धावांची जिगरबाज खेळी केली, पण शेवटी त्याचे प्रयत्न अपुरेच ठरले.

### मानव सुथारच्या फिरकीची कमाल

लंच ब्रेकनंतर श्रीलंकेच्या डावातील ७६ व्या षटकात मानव सुथार याने एकाच षटकात तीन विकेट्स घेतल्या. पुढच्या षटकात त्यानेच अखेरची विकेट घेत भारतीय संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. युवा फिरकीपटूने गॉल कसोटीत सर्वोत्तम कामगिरी करताना आपल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात १० विकेट्सचा डाव साधला. मानव सुथार हा परदेशात गोलंदाजी करताना अशी कामगिरी करणारा सर्वात युवा भारतीय फिरकी गोलंदाज ठरला आहे.

एफआयएच महिला हॉकी विश्वचषक स्पर्धा

# भारताकडून दक्षिण आफ्रिकेचा धुव्वा



**ॲम्स्टेलवीन : वृत्तसंस्था**

एफआयएच महिला हॉकी विश्वचषकात भारतीय महिला संघाने दमदार कामगिरी करत दक्षिण आफ्रिकेचा तब्बल ६-१ असा पराभव केला. पूल-डी मधील दुसऱ्या सामन्यात भारताने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत दक्षिण आफ्रिकेवर वर्चस्व गाजवले. या विजयासह भारताने दोन सामन्यांतून चार गुण मिळवत पूल-डीमध्ये अव्वल स्थान पटकावले असून पुढील फेरीतील प्रवेश जवळपास निश्चित केला आहे.

भारतीय संघाने सामन्यात तब्बल सहा वेगवेगळ्या खेळाडूंकडून गोल नोंदवत आपली आक्रमक ताकद दाखवून दिली. सुनेलिता टोप्पोने ११व्या मिनिटाला भारताचे खाते उघडलं. त्यानंतर नवनीत कौरने १७व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरचे रूपांतर गोलमध्ये करत भारताची आघाडी २-० केली. पुढे सुशीला चानूने २५व्या मिनिटाला गोल करत भारताला ३-० अशी भक्कम आघाडी मिळवून दिली. सामन्याच्या दुसऱ्या सत्रातही भारतीय खेळाडूंचा आक्रमक पवित्रा कायम राहिला. दीपिकाने ३८व्या मिनिटाला शानदार टॉमहॉक शॉटद्वारे चौथा गोल केला. त्यानंतर लालरेम्सियामीने ४४व्या मिनिटाला पाचवा गोल करत भारताचा विजय जवळपास निश्चित केला. अवघ्या एका मिनिटानंतर साक्षी राणाने ४५व्या मिनिटाला गोल करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. दक्षिण आफ्रिकेकडून अखेरीस कायला डी वॉलने पेनल्टी कॉर्नरवर एकमेव गोल केला.

**टीम इंडियाचा सर्वात मोठा विजय**

विशेष म्हणजे, हा महिला हॉकी विश्वचषकाच्या इतिहासातील भारताचा सर्वात मोठा विजय ठरला आहे. यापूर्वी १९७४मध्ये भारताने स्पेनचा ४-१ असा पराभव केला होता. यंदाच्या स्पर्धेत मात्र भारतीय संघाने त्यापेक्षाही मोठा विजय मिळवत इतिहास रचला आहे. आता भारताचा पूलमधील अखेरचा सामना २० ऑगस्टला इंग्लंडविरुद्ध होणार आहे. भारताला पुढील फेरीत पोहचण्यासाठी या सामन्यात किमान एक गुण म्हणजेच बरोबरी पुरेशी ठरणार आहे.

# प्रांजल पाटीलची सायकल मास्टर किताबाची हॅट्ट्रिक

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागच्या प्रांजल पाटीलने प्रभादेवी येथील कस्टम पॉईंट वेल्फेअर सोसायटीतर्फे १५ ऑगस्ट रोजी आयोजित २.२ किलोमीटर अंतराच्या सायकल शर्यतीत अव्वल कामगिरी करत सलग तिसऱ्यांदा सायकल मास्टर २०२६ हा किताब पटकावला.




विशेष म्हणजे, प्रांजलने हे अंतर अवघ्या ३ मिनिटे ५ सेकंदांत पूर्ण करून कस्टम पॉईंट वेल्फेअर सोसायटीच्या सायकल शर्यतीचा तब्बल ४५ वर्षांचा विक्रम मोडीत काढला. सलग तीन वर्षे किताब पटकावत प्रांजलने या स्पर्धेत हॅट्ट्रिक साधली आहे.

कस्टम पॉईंट वेल्फेअर सोसायटीचे हे ४६ वे वर्ष असून यंदाच्या स्पर्धेत मुंबई, सांगली, सातारा, कोल्हापूर तसेच अलिबाग येथील स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विविध वयोगटांतील महिला व पुरुष सायकलपटूंनी या स्पर्धेत आपले कौशल्य पणाला लावले.

# अजिंक्य रहाणेने केली रवी शास्त्रींची नक्कल

**मुंबई : प्रतिनिधी**



भारताचा माजी कर्णधार अजिंक्य रहाणेने काही दिवसांपूर्वी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. त्यानंतर त्याने कॉमेंट्रीमध्ये पदार्पण केले आणि भारत-श्रीलंका सामन्यात तो समालोचकाच्या भूमिकेत दिसत आहे. समालोचनादरम्यान रहाणे हा रवी शास्त्रींची नक्कल करताना दिसला, ज्याचा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे.

रहाणे सध्या 'सोनी स्पोर्ट्स नेटवर्क'साठी समालोचन करत आहे. भारत-श्रीलंका संघांमधील पहिल्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी एक मजेशीर प्रसंग घडला, जेव्हा रहाणेने शास्त्रींच्या शैलीत समालोचन केले; त्याच्या या मिमिक्रीने (नक्कल करण्याच्या शैलीने) चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.

# माणगावच्या खर्डीमध्ये रंगणार फुटबॉल प्रीमियर लीग

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील फुटबॉलप्रेमींसाठी उत्साहाची पर्वणी ठरणारी माणगाव प्रीमियर लीग फुटबॉल स्पर्धा येत्या रविवारी (दि.२३) खर्डी येथील तालुका क्रीडा संकुलात रंगणार आहे. माणगाव फुटबॉल क्लबच्या वतीने आयोजित या स्पर्धेत स्थानिक तसेच परिसरातील फुटबॉल संघांना आपले कौशल्य, संघभावना आणि जिद्द दाखविण्याची संधी मिळणार आहे.

या स्पर्धेचे आयोजन ७+३ फॉरमॅटमध्ये करण्यात आले असून स्पर्धेचा प्रारंभ लीग आणि त्यानंतर नॉकआउट पद्धतीने होणार आहे. त्यामुळे प्रत्येक सामन्यात विजयासाठी संघांना अखेरच्या क्षणापर्यंत झुंज द्यावी लागेल. यानिमित्ताने फुटबॉलप्रेमींना चुरशीचे आणि रंगतदार सामने पाहण्याची संधी मिळणार आहे.

विजेत्या संघाला १० हजार रुपये आणि आकर्षक चषक, तर उपविजेत्या संघाला



पाच हजार रुपये आणि चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. याशिवाय स्पर्धेत वैयक्तिक कामगिरी करणारा सर्वोत्तम खेळाडू, सर्वोत्तम बचावपटू आणि सर्वोत्तम गोलरक्षक यांची विशेष पुरस्कारांसाठी निवड केली जाणार आहे.

स्पर्धेत सहभाग तसेच अधिक माहितीसाठी ओम (७०४५२१४९३३), अभि (७०८३१६५७६४) किंवा अरविंद (८१०४६६२५२५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# यशस्वीने डिवचले अन् डिकवेला बाद झाला!

**कोलंबो : वृत्तसंस्था**

गॉल कसोटीच्या पाचव्या आणि अखेरच्या दिवशी प्रसिद्ध कृष्णाने भारतीय संघाला निरोशन डिकवेलाच्या रूपाने सहावे यश मिळवून दिले. ही विकेट कृष्णाच्या खात्यात जमा झाली असली, तरी त्याचे खरे श्रेय यशस्वी जैस्वालला जाते.

सोनल दिनुषा आणि धनंजय डी सिल्वा यांची जोडी फुटल्यानंतर डिकवेला फलंदाजीसाठी मैदानात आला. पहिल्या डावात त्याने सोनल दिनुशासोबत दमदार भागीदारी रचली होती. याचाच संदर्भ देत यशस्वीने संयमी फलंदाजी करणाऱ्या डिकवेलाला डिवचले.

यशस्वीच्या जैस्वालच्या या टोमण्याला डिकवेला भुलला आणि त्याने मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला, मात्र 'हिंमत दाखवण्याच्या' नादात त्याला आपल्या विकेटची मोठी किंमत मोजावी लागली. परिणामी प्रसिद्ध कृष्णाच्या गोलंदाजीवर तो बाद झाला आणि भारताला श्रीलंकेची सहावी विकेट मिळाली.

# ऐतिहासिक विजयानंतर कर्णधार गिलकडून खेळाडूंचे कौतुक

**गॉल : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने श्रीलंकाविरूद्ध गॉल कसोटीत ऐतिहासिक विजय मिळवला आहे. भारतीय संघासाठी हा ६००वा कसोटी सामना होता, त्यामुळे हा विजय अधिक खास होता. या विजयात मानव सुथार आणि देवदत्त पडिक्कल यांनी विशेष योगदान दिले. भारताच्या या विजयानंतर कर्णधार शुबमन गिलने प्रतिक्रिया दिली.

मानव सुथारबद्दल कॅप्टन म्हणाला, तो अप्रतिम गोलंदाजी करत आहे. भारताकडून अफगाणिस्तानविरुद्धच्या पहिल्या सामन्यातही त्याने चांगली गोलंदाजी केली होती आणि या सामन्यातही त्याची कामगिरी शानदार आहे. तो खूपच आश्वासक खेळाडू दिसतो आणि दीर्घकाळ भारतासाठी खेळण्याची क्षमता त्याच्यात आहे.

देवदत्त पडिक्कलबद्दल गिलने सांगितले की, त्याची फलंदाजी पाहणे



खरोखरच शानदार होते. शतक करणे महत्त्वाचे असते, पण शतक पूर्ण केल्यानंतरही त्याने ज्या पद्धतीने फलंदाजी सुरू ठेवली आणि संघासाठी मोठी धावसंख्या उभारली. यामुळेच सामना अटीतटीचा असण्यापासून जिंकण्याच्या स्थितीत बदलला. दुसऱ्या डावातही त्याने ज्या पद्धतीने फलंदाजी केली आणि फिरकी गोलंदाजांवर वर्चस्व गाजवले, ते पाहणे खरोखरच आनंददायी होते.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपसाठी हा विजय किती महत्त्वाचा आहे, यावर गिल म्हणाला, नक्कीच, तेच आमचे अंतिम लक्ष्य आहे आणि त्यासाठीच आम्ही खेळत आहोत. कसोटी सामने जिंकणे सोपे नसते आणि त्यामुळे हा विजय मिळवणे आमच्यासाठी खूप आनंददायी आहे.

**समाधान देणारा विजय!**

६००वी कसोटी भारतासाठी खेळताना हा विजय किती खास आहे, यावर कर्णधार गिल म्हणाला, हा विजय खूपच शानदार आहे. आपल्या देशासाठी ६००वी कसोटी जिंकणे खरोखरच विशेष आहे. आमच्यासाठी हा खूप समाधान देणारा विजय आहे. आम्ही चांगल्या स्थितीत होतो, पण हवामानामुळे सामना सुरू राहील की नाही याची खात्री नव्हती. त्यामुळे आमच्यावर थोडा दबाव होता, पण संघाने परिस्थितीला खूप चांगल्या पद्धतीने प्रतिसाद दिला.

# जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत भारताची आगेकूच

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये सुरू असलेल्या बीडब्ल्यूएफ जागतिक अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंची दमदार कामगिरी सुरू आहे. पुरुष एकेरीत लक्ष्य सेन, महिला एकेरीत उन्नती हुड्डा यांनी विजयी सलामी देत दुसरी फेरी गाठली आहे, तर महिला दुहेरीतील ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीने थेट उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत १४वा मानांकित लक्ष्य सेनला ऑस्ट्रियाच्या कॉलिन्स व्हॅलेंटाईन फिलिमॉनने पहिल्या गेममध्ये चांगलेच अडचणीत आणले. फिलिमॉनने पहिला गेम २१-१६ असा जिंकला, पण लक्ष्यने





परिस्थिती झटपट बदलत पुढील दोन्ही गेममध्ये २१-८, २१-४ अशी बाजी मारली. ४५ मिनिटांच्या या सामन्यात शानदार पुनरागमन करत लक्ष्यने दुसरी फेरी गाठली. आता त्याची लढत अमेरिकेच्या गॅरेट टॅनशी होणार आहे.

महिला एकेरीत १८ वर्षीय उन्नती हुड्डाने म्यानमारच्या थेट हतार थुझारचा २२-२०, २१-१६ असा पराभव करत आपल्या पहिल्याच जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत विजयी सुरुवात केली. उन्नतीने ४० मिनिटांच्या लढतीत संयमी खेळ करत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. तिची पुढील लढत कॅनडाच्या १३व्या मानांकित मिशेल लीशी होणार आहे.

महिला दुहेरीत मात्र ट्रीसा जॉली-गायत्री गोपीचंद जोडीने

### लक्ष्य, उन्नती विजयी, ट्रीसा-गायत्री उपउपांत्यपूर्व फेरीत

शानदार विजय मिळवला. बिगरमानांकित भारतीय जोडीने १६व्या मानांकित अमेरिकेच्या लॉरेन लॅम-ॲलिसन ली जोडीचा २१-१५, २१-१२ असा सरळ गेममध्ये पराभव केला. या विजयामुळे त्यांनी स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व फेरीत स्थान निश्चित केले.

मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला-तनिषा क्रास्टो या १५व्या मानांकित भारतीय जोडीचे आव्हान अजून कायम आहे. पहिल्या फेरीत बाय मिळाल्यानंतर ही जोडी दुसऱ्या फेरीत मकाऊच्या लिआंग लोक चोंग-वेंग चो एनजी जोडीशी भिडणार आहे.

# 'डब्ल्यूटीसी'तील धावांमध्ये पंतने गिलला टाकले मागे



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

श्रीलंकेविरुद्धच्या गॉल कसोटी सामन्यातील दुसऱ्या डावातील अर्धशतकी खेळीसह भारताचा विकेट किपर बॅटर ऋषभ पंत याने कसोटीत सर्वात जलद १०० षटकार मारण्याच्या वर्ल्ड रेकॉर्डसह कर्णधार शुबमन गिलला धोबीपछाड देण्याचा डावही साधला.

श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यातील दुसऱ्या डावात पंतने ६९ चेंडूत ६६ धावांची दमदार खेळी केली. या खेळीसह तो आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेत भारताकडून सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत अव्वलस्थानी पोहचला आहे.

पंतने आतापर्यंत आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेतील ४१ कसोटीतील ७३ डावांत २८८५ धावा केल्या आहेत. तो गिलच्या आधी ३००० धावांचा पल्ला गाठणारा पहिला भारतीय ठरणार का? ते पाहण्याजोगे असेल.

भारतीय कसोटी संघाचा कर्णधार शुबमन गिल याने ४१ कसोटीत २८६७ धावा केल्या असून तो या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे. श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत गिल मोठी खेळी करण्यात अपयशी ठरला. त्याने पहिल्या डावात १६ धावा, तर दुसऱ्या डावात फक्त आठ धावांची खेळी केली.

# डार्विनमधील पराभवानंतर ऑस्ट्रेलियाचा मोठा निर्णय

## जॅक वेदरल्ड आऊट, मॅथ्यू रेनशॉ इन!



**डार्विन : वृत्तसंस्था**

बांगलादेशविरुद्धच्या दुसऱ्या आणि अंतिम कसोटी सामन्यापूर्वी ऑस्ट्रेलियन संघात महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. डार्विन कसोटीतील लाजीरवाण्या पराभवानंतर खराब फॉर्ममध्ये असलेल्या सलामीवीर जॅक वेदरल्डला संघातून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला असून त्याच्या जागी डाव्या हाताचा फलंदाज मॅथ्यू रेनशॉ याचा संघात समावेश करण्यात आला आहे.

डार्विन येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटीत बांगलादेशने ऑस्ट्रेलियाचा नऊ गडी राखून दणदणीत पराभव करत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. या सामन्यात तंत्रात बदल करूनही वेदरल्डला दोन्ही डावांत मिळून अवघ्या २३ आणि ० धावा करता आल्या. गेल्या वर्षी ॲशेस मालिकेत पदार्पण केल्यापासून वेदरल्डने सहा कसोटी सामन्यांत २०.३६च्या सरासरीने केवळ २२४ धावा केल्या आहेत. त्याच्या जागी ३० वर्षीय मॅथ्यू रेनशॉला संघात स्थान देण्यात आले आहे. याशिवाय, जोश इंग्लिसदेखील ट्रॅव्हिस हेडसोबत फलंदाजीला येण्याचा एक पर्याय म्हणून उपलब्ध आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com